

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०२ * नांदेड * शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

दिल्लीत सुप्रिया सुळे-प्रफुल पटेलांची बैठक; राष्ट्रवादीतील विलीनीकरणाच्या चर्चांना गती

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- राज्याच्या राजकारणात दिवाळीनंतर मोठा भूकंप पाहायला मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून वर्तवली जात आहे. कारण, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू असून आता राष्ट्रवादीचे नेतेही या चर्चेवर सकारात्मक प्रतिक्रिया देताना दिसून येतात. मात्र, माझा भाऊ गेला, आमच्याकडून विलीनकरणाच्या चर्चेला पूर्णविराम मिळालाय, असे शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले होते. त्यानंतर, राजधानी दिल्लीत दोन्ही राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांची दिल्लीत बैठक झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

राज्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या हालचाली गतीमान असल्याचं दिसून येत आहे.



कारण, आधी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, त्यानंतर मंत्री छगन भुजबळ यांनीही अजित पवारांच्या हयातीतच राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चा झाली होती, जयंत पाटील आणि अजित पवारांची भेट झाल्यानंतर हा विषय चर्चेत होता, असे भुजबळ यांनी म्हटले. तर, दुसरीकडे राजधानी दिल्लीत वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी आणि चर्चा सुरू असल्याचे दिसून येते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांची दिल्लीत बैठक झाली, संसदेच्या परिसरात दोन्ही नेत्यांची ही भेट झाली असून ३५ मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. संसदेत दुपारी दोघांनीही एकत्र लंच केले, त्यामुळे विलीनीकरणाची लंच डिप्लोमसी होती की काय, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

विलिनीकरणाबाबत अजित पवार अन् जयंत पाटलांची माझ्यासमोरच चर्चा झाली होती; भुजबळांचा गौप्यस्फोट

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची चर्चा जोरात सुरू असून विलिनीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. यापूर्वी देखील विलिनीकरणाची चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. विलिनीकरणाबाबत अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात माझ्याच उपस्थितीत चर्चा झाली होती, अजित पवार चांगलं नेतृत्व करत आहेत, तुम्ही एकत्र आलं पाहिजे असे मी त्यांना म्हणालो होतो. त्यावेळी, ४० ते ४५ मिनिटे चर्चा झाली होती, असा मोठा दावा देखील भुजबळ यांनी केला.

पार्थ पवारांची पुण्यात आमदारांसोबत बैठक

पुण्यात पार्थ पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्त्वाचे पदाधिकारी आणि ठराविक आमदारांची बैठक पार पडली आहे. पार्थ पवार यांनी इतक्या तातडीने ही बैठक का बोलावली आणि या बैठकीला ठराविक आमदारांनाच का बोलावले, याविषयी राजकीय वर्तुळात निरनिराळे तर्क लढवले जात होते अशातच बैठकीनंतर आलेल्या आमदारांनी याबाबतची माहिती दिली आहे. या बैठकीवेळी आमदार माऊली कटके, आमदार शंकर मांडेकर, आमदार चेतन तुपे उपस्थित होते अशी माहिती समोर आली आहे.

आसामच्या काझीरंगामध्ये राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात, ट्रक-बसच्या अपघातात २३ जणांचा मृत्यू

मृतांची संख्या वाढण्याची शक्यता



गुवाहाटी (प्रतिनिधी)- आसामच्या काझीरंगामध्ये बस आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातामध्ये २३ जणांचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी या दुर्घटनेला दुजोरा दिला आहे.

आसाममधील गोलाघाट जिल्ह्यातील जिल्हा आयुक्त विश्वजीत फुकन यांनी आसामच्या गोलाघाट जिल्ह्यात काझीरंगा येथे रोंगाजान भागात एक अपघात झाला आहे. त्यामध्ये काही जण मृत्यू झाल्या आहेत तर, काही जण जखमी झाल्याची माहिती असल्याचं म्हटलं आहे. विश्वजीत फुकन यांनी दिलेल्या माहितीनुसार जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. स्थानिक माध्यमांच्या माहितीनुसार बसमध्ये ३५ ते ४० प्रवासी प्रवास करत होते. एक प्रवासी मिनी बस वेगात जाऊन एका ट्रेलर म्हणजेच ट्रकवर आदळल्याची माहिती आहे. जखमींना मडॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर, गंभीर जखमींना बोकाखाट आणि जोरहाट रुग्णालयात पाठवण्यात आलंय, अशी माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मिनीबस जोरहाटकडून गुवाहाटीच्या दिशेनं निघाली होती. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार राष्ट्रीय महामार्ग ७१५ वरील हाथीकुली टी इस्टेट, कोहरा रागांच्या जवळ रनगजन जवळ अपघात झाला आहे. गोलाघाटच्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार मृतांची संख्या वेगानं वाढू शकते, ताज्या अपडेटनुसार २३ जणांचा मृत्यू झाल्याच्या माहितीला दुजोरा मिळाला आहे. मृतांची ओळख पटवण्याच काम सुरु असल्याचं कळतंय.

गोलाघाटचे पोलीस अधीक्षक स्वप्नील डेका यांनी प्राथमिक माहितीनुसार अपघातात २३ जणांचा मृत्यू झाला आहे. आम्ही घटनास्थळी उपस्थित आहोत. बसमधून मृतदेह बाहेर काढले जात आहेत.

नांदेड जिल्ह्यात ३०० ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांची निवड; १८४ जणांना मानधन

उर्वरित लाभार्थ्यांच्या मंजुरीची कार्यवाही सुरू

नांदेड (प्रतिनिधी)- ज्येष्ठ साहित्यिक आणि कलावंतांच्या कलासेवेचा सन्मान करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजने अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील एकूण ३०० कलावंतांची निवड करण्यात आली आहे. या निवड यादीला अंतिम मंजुरी मिळण्याची प्रक्रिया सुरू असून, पहिल्या टप्प्यात १८४ लाभार्थ्यांना पीपीओ क्रमांक प्राप्त झाल्याने त्यांचे मानधनही सुरू झाले आहे. उर्वरित लाभार्थ्यांच्या मंजुरीसाठीची कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत या योजनेची प्रक्रिया राबविण्यात येते. सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या तीन वर्षांतील प्रलंबित अर्जांच्या निवडीसाठी जिल्हास्तरीय निवड समिती गठित करून प्रक्रिया राबविण्यात आली. सुरुवातीला सन २०२३-२४ मधील ३१६, सन २०२४-२५ मधील १ हजार ९६ आणि सन २०२५-२६ मधील ५१५ अर्ज छाननीअंती पात्र ठरले होते.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली ४ ते ८ मे २०२६ या कालावधीत पात्र कलावंतांच्या प्रत्यक्ष कला सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २०२३-२४ मधील २४९, २०२४-२५ मधील ८५७ आणि २०२५-२६ मधील ४१५ कलावंतांनी आपली कला सादर केली. त्यानंतर कलावंतांचे वय, विधवा अथवा निराधार स्थिती, दिव्यांगत्व, प्राप्त पुरस्कार, कलाक्षेत्रातील सेवा कालावधी आणि प्रत्यक्ष कला सादरीकरण यासाठी निर्धारित गुणांच्या आधारे गुणानुक्रम तयार करण्यात आला. एकूण ३५ गुणांच्या निकषांनुसार प्रत्येक वर्षासाठी १०० याप्रमाणे ३०० कलावंतांची निवड करून त्यांची यादी अंतिम मंजुरीसाठी पर्यटन व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथे पाठविण्यात आली.

सध्या निवड झालेल्या ३०० कलावंतांपैकी १८४ जणांना पीपीओ क्रमांक मिळून मानधन सुरू झाले आहे. उर्वरित ११६ लाभार्थ्यांपैकी १६ जणांची तांत्रिक पडताळणी, केवायसी आणि पीपीओ क्रमांक निर्गमनाची प्रक्रिया सुरू आहे, तर सन २०२५-२६ मधील १०० लाभार्थ्यांच्या अंतिम मंजुरीचे आदेश अद्याप प्राप्त होणे बाकी आहेत.

दरम्यान, जिल्हास्तरीय समितीच्या ४ नोव्हेंबर २०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार, निवड झालेल्या सर्व ३०० लाभार्थ्यांची एकत्रित यादी सोशल मीडिया तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही संपूर्ण निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली असून, ज्येष्ठ साहित्यिक व कलावंतांनी कोणत्याही आमिषाला किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला बळी पडू नये. मानधन मंजूर करून देण्याच्या नावाखाली कोणी पैशांची मागणी अथवा आमिष दाखविल्यास संबंधितांनी तातडीने जिल्हाधिकारी कार्यालय किंवा जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अजितदाद गेल्यानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची चर्चांना आमच्याकडून पूर्णविराम -खासदार सुळे

मुंबई (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चांनी जोर धरला आहे. शरद पवार यांना अजितदादा गटाचे नेते भेटत असल्याने या चर्चांना अधिकच हवा मिळत आहे. पण या हवाबाजीला शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पूर्णविराम दिला आहे. अजितदादा होते, तेव्हा विलिनीकरणावर चर्चा सुरू होती. भावाचं निधन झालं आणि हा विषयही तिथेच संपला, असं भावनिक उद्गार सुप्रिया सुळे यांनी काढलं.

संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या बंगल्याबाहेर तीन मद्यपींचा राडा, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर शिरसाटांचा सवाल

मुंबई (प्रतिनिधी)- राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय सिरसाट यांच्या घरावरती हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. या हल्ल्यामध्ये दोन सुरक्षारक्षक जखमी झाल्याचे सांगण्यात येतंय. तर तीन तरुणांनी घरासमोर येऊन दारूच्या बाटल्या फोडल्या असल्याची माहिती आहे. दरम्यान या हल्ल्यानंतर मंत्री संजय शिरसाठ यांनी पोलिसांवर संताप व्यक्त केला आहे. पोलीस आयुक्तांना फोन केला असता त्यांचा फोन बंद होता, असं संजय सिरसाट म्हणाले.

दरम्यान, याप्रकरणी छत्रपती संभाजीनगरच्या सातारा पोलिसांकडून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्या घरावर हल्ला करणाऱ्या तिघांची पोलिसांकडून कसून चौकशी सुरू असून आरोपी विरोधातरात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रियासुरू होती.

संध्याकाळी साधारणतः साडे दहा ते अकराच्या दरम्यन ३ युवक माझ्या बंगल्यासमोर आले. पिलेल्या अवस्थेत ते होते, असं एकंदरीत ते दिसतंय. बाटल्या फोडल्या, आणि अनेक गोष्टी माझ्या खिशात असल्याचे सांगत घराकडे येऊन हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, या संदर्भात पोलीस आयुक्तांना फोन केला असता त्यांचा फोन बंद होता, असं संजय सिरसाट म्हणाले.

जेन्सेन हुआंग यांचा राजीनामा




वॉशिंग्टन (वृत्तसंस्था)- एनव्हिडियाचे सहसंस्थापक आणि सीईओ जेन्सेन हुआंग यांनी तब्बल ३३ वर्षांनंतर आपल्या पदाचा तात्काळ प्रभावाने राजीनामा दिला आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने यासंदर्भात घोषणा केली असून, त्यांच्या योगदानाबद्दल कंपनीने केवळ दोन वाक्यांत आभार व्यक्त केले आहेत. हुआंग यांच्या जागी कंपनीच्या सीएफओ कोलेट क्रेस यांच्याकडे अंतरिम सीईओ पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

एनव्हिडियाने अधिकृत निवेदनात जेन्सेन हुआंग यांच्या योगदानाचा उल्लेख करताना म्हटलं आहे की, एनव्हिडियामधील जेन्सेन यांचं योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

एमपीएससी पेपरफुटीसंदर्भात तक्रार, निवेदनं करण्यास मुदतवाढ; दिवाळीच्या सुटट्यांमुळे चौकशी समितीचा निर्णय

मुंबई (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या काही महिन्यात झालेल्या पेपरफुटीवरुन विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट दिसून आली. विशेष म्हणजे, एमपीएससी सारख्या अतिमहत्त्वाच्या परीक्षेतही घोटाळा झाल्याचं उघडकीस आल्यानंतर संबंधित परीक्षांची, गैरप्रकाराची चौकशी करण्याची मागणी एमपीएससी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून करण्यात आली. त्याच, अनुषंगाने पुण्यात आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात मोठं आंदोलन देखील उभारण्यात आलं. अखेर, सरकारने निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे. त्यातच, आता पेपरफुटीसंदर्भात विद्यार्थ्यांना तक्रारी, निवेदनं करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीत सनदी अधिकारी तुकाराम मुंडेंचाही सहभाग करण्यात आला आहे. त्यामुळे, पारदर्शक आणि नि:पक्ष चौकशी करण्यात येईल, असा विश्वास विद्यार्थी आणि पालकांना आहे. त्यातच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षांमधील गैरव्यवहार, प्रश्नपत्रिका किंवा उत्तरतालिका फुटल्याच्या कथित प्रकरणांची चौकशी करण्यासाठी गठीत केलेल्या चौकशी आयोगाने या प्रकरणांशी संबंधित माहिती असलेल्या व्यक्ती, परीक्षार्थी/विद्यार्थी यांना आपली निवेदने आयोगाकडे सादर करण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.



गोरं होण्याच्या नादात जीवाशी खेळ! पाकिस्तानी क्रीममध्ये पारा व आर्सेनिकचे विषारी घटक

नांदेडमध्ये ३९ लाखांच्या बनावट कॉस्मेटिक्समध्ये सापडले विषारी धातू; नागरिकांना सावधगिरीचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)- शहरात अवैधपणे विक्रीस ठेवण्यात आलेल्या 'मेड इन पाकिस्तान' लेबल असलेल्या ३९ लाख ६९ हजार ९४० रुपये किंमतीच्या बनावट सौंदर्यप्रसाधनांच्या (कॉस्मेटिक्स) साठ्यावर इतवारा पोलिसांनी दि. ९ जुलै २०२६ रोजी कारवाई केली होती.

या कारवाई दरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या मदतीने जप्त करण्यात आलेल्या सौंदर्यप्रसाधनांच्या नमुन्यांचा शासकीय विश्लेषण अहवाल प्राप्त झाला असून, सदर सौंदर्यप्रसाधनांमध्ये मानवी शरीरास अत्यंत घातक असलेल्या पारा आणि आर्सेनिक या विषारी धातूंचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा हजारो पटींनी जास्त असल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारताच दि. ९ जुलै २०२६ रोजी इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस पथकाने आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमवेत मन्यार गल्ली, बर्फी चौक, इतवारा, नांदेड येथील मे. अफरा कलेक्शन (अफराह टूर्स अँड ट्रॅव्हल्स) या दुकानावर छापा टाकला होता.

यावेळी दुकान चालक मोहम्मद जियाउद्दीन मोहम्मद वाजीद (वय २५ वर्षे, रा. मन्यार गल्ली, ह.मु. हैदरबाग, देगलूर नाका, नांदेड) याच्याकडून विविध ब्रँडची 'मेड इन पाकिस्तान' असे उर्दू व इंग्रजीत लेबल असलेली एकूण ३९ लाख ६९ हजार ९४० रुपये किंमतीची सौंदर्यप्रसाधने जप्त करण्यात आली होती.

या प्रकरणी पोलीस स्टेशन इतवारा येथे गु.र.नं. २४२/२०२६, कलम १२३, ३१८ (४) भारतीय न्याय संहिता सह कलम १८(सी), २७ (२) (बी) औषधी व सौंदर्य प्रसाधने अधिनियम आणि कलम ३ (३), ११ (२) विदेश व्यापार अधिनियम कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता.

जप्त मुद्देमालातून नमुने घेऊन ते तपासणीसाठी शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा येथे पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या अहवालातील निष्कर्ष अत्यंत धक्कादायक आहेत.

सौंदर्यप्रसाधने नियमांनुसार सौंदर्यप्रसाधनांमध्ये पाऱ्याचे प्रमाण जास्तीत जास्त ०१ झझच् असणे बंधनकारक आहे. मात्र PARLEY 24K GOLD GLEAM BEAUTY CREAM या क्रीममध्ये पाऱ्याचे प्रमाण तब्बल ४८,४५३.४४ PPM (म्हणजेच विहित मर्यादेपेक्षा ४८ हजार पटींहून अधिक) आढळून आले आहे.

GOREE BEAUTY CREAM WITH LYCOPENE या क्रीममध्ये पाऱ्याचे प्रमाण तब्बल ६,९२४.९४ झझच् (म्हणजेच विहित मर्यादेपेक्षा जवळपास ७ हजार पटींनी जास्त) आढळून आले आहे.

अशा प्रकारच्या बनावट व अवैध सौंदर्यप्रसाधनांमध्ये असलेला अतिउच्च पातळीवरील पारा आणि आर्सेनिक मानवी त्वचेवाटे शरीरात शोषला जाऊन त्वचेचे गंभीर आजार, किडनी निकामी होणे, मज्जासंस्थेवर परिणाम होणे अशा जीवघेण्या समस्या निर्माण करू शकतो. नागरिकांनी सौंदर्यप्रसाधने खरेदी करताना केवळ गोरेपणाच्या जाहिरातींना बळी न पडता उत्पादनांचे अधिकृत लेबल, उत्पादन परवाना क्रमांक (Mfg. Lic. No.) आणि दर्जा यांची खातरजमा करावी. अशा प्रकारे अवैध, विनापरवाना किंवा विदेशी बनावट वस्तूंची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा नांदेड जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षास (०२४६२-२३४७२०) किंवा डायल ११२ वर माहिती द्यावी, असे आवाहन नांदेड जिल्हा पोलीस दलाने केले आहे.

टीम इंडियासाठी काळा दिवस! टीम इंडिया ८९ धावांवर गारद

मुंबई (प्रतिनिधी)- न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या एकदिवसीय सामन्यात भारतीय संघाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. माऊंट माउंगानुई येथे खेळल्या गेलेल्या या सामन्यात न्यूझीलंडने भारताचा तब्बल २४४ धावांनी धुव्वा उडवला. ३३४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाचा डाव अवघ्या ८९ धावांवर आटोपला. भारताने २६.४ षटकांत सर्व १० विकेट गमावल्या. या पराभवासह न्यूझीलंडविरुद्ध धावांच्या फरकाने झालेल्या भारताच्या सर्वात मोठ्या पराभवाची नोंद झाली आहे. यापूर्वी हा नकोसा विक्रम २०१० मध्ये भारताच्या नावावर झाला होता.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. द्वैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

औषधी निर्मिती कंपन्यांकडून लूट!

कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराने एखाद्या कुटुंबाला घेरले की त्यांच्यासमोर उपचाराचा खर्च हा दुसरे मोठा संकट बनते. रुग्णाचा जीव वाचविण्यासाठी घर, जमीन, दागिने विकण्याची वेळ येते. असे होण्याचे कारण म्हणजे जीवनावश्यक औषधांच्या किमतीत अवाजवी वाढ. अशा परिस्थितीत वारेमाप नफा कमावला जात असेल, तर तो केवळ बाजारपेठेचा विषय राहत नाही; तो मानवी संवेदनेचा आणि सार्वजनिक आरोग्याच्या हक्काचा प्रश्न बनतो. कर्करोगावरील अत्यावश्यक औषधाची पुरवठा किंमत २,७०० रुपये असताना त्याची कमाल किरकोळ किंमत तब्बल २७ हजार रुपये ठेवण्यात आल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आले. पुरवठा किमतीच्या दहापट एमआरपी असण्याबाबत न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित यंत्रणा अशा प्रकारांवर कारवाई का करत नाहीत, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला. या निरीक्षणामुळे औषधांच्या किमतीच्या नियंत्रणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. औषध हे सामान्य ग्राहकाच्या पसंतीवर अवलंबून असलेले उत्पादन नाही. तहान लागली म्हणून पाणी न घेण्याचा किंवा महाग वाटले म्हणून औषध न घेण्याचा पर्याय रुग्णाकडे नसतो. विशेषतः कर्करोग, हृदयरोग, मधुमेह किंवा इतर गंभीर आजारांमध्ये डॉक्टरांनी लिहून दिलेले औषध वेळेवर घेणे उपचाराचा अविभाज्य भाग असते. कारण सामान्य लोकांना वैद्यकीय क्षेत्रातले कोणतेही ज्ञान नसते. त्यामुळे अशा औषधांच्या किंमतीवर बाजारातील मागणी-पुरवठ्याच्या नियमांचा एकतर्फी आधार घेतला जातो. औषधनिर्मिती क्षेत्राला संशोधन, उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, वितरण आणि विपणन यासाठी खर्च येतो, हे मान्य. उद्योगाला वाजवी नफा मिळण्याचा अधिकारही आहे. परंतु वाजवी नफा आणि अमर्याद नफा यात स्पष्ट सीमा असली पाहिजे. जीवन वाचविण्यासाठी आवश्यक असलेल्या औषधावर कितीही किंमत लावता येईल, अशी मानसिकता निर्माण झाली तर आरोग्यव्यवस्था हळूहळू रुग्णकेंद्री न राहता नफाकेंद्री होण्याचा धोका आहे. याच ठिकाणी शासनाची जबाबदारी निर्णायक ठरते. औषध निर्मिती कंपन्यांचा उधळलेला कठाळ्या थांबवायचा असेल तर शासनानेच कठोर पावले उचलली पाहिजेत. औषधांच्या किमती निश्चित करण्याची विद्यमान व्यवस्था किती प्रभावी आहे, तिच्या अंमलबजावणीवर कोणाचे नियंत्रण आहे आणि नियमांचा भंग करणाऱ्यांवर किती वेळा कठोर कारवाई होते, याचा सार्वजनिक आढावा घेणे आवश्यक आहे. केवळ एमआरपी छापण्याची परवानगी देणे पुरेसे नाही. उत्पादन खर्च, आयात खर्च, वितरण खर्च, व्यापारी मार्जिन आणि उत्पादकाचा वाजवी नफा यांचा पारदर्शक ताळमेळ साधून किंमत निश्चित करण्याची व्यवस्था अधिक कठोर करावी लागेल. विशेषतः अत्यावश्यक आणि जीवनरक्षक औषधांसाठी कमाल नफा मर्यादा, पारदर्शक किंमत निर्धारण आणि नियमित ऑडिट अनिवार्य केले पाहिजे. उत्पादकापासून घाऊक विक्रेता, रुग्णालय आणि किरकोळ विक्रेता यांच्यापर्यंतच्या किंमत साखळीचा मागोवा घेण्याची डिजिटल यंत्रणा उभारली तर अवास्तव दरवाढीवर अंकुश ठेवणे शक्य आहे. नियम मोडणाऱ्यांना केवळ दंड करून भागणार नाही; वारंवार नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईची तरतूद असली पाहिजे. यासोबतच जेनेरिक औषधांच्या उपलब्धतेला चालना देणे, रुग्णांना औषधांच्या किंमतीची माहिती सहज उपलब्ध करून देणे आणि डॉक्टरांनी शक्य त्या ठिकाणी जेनेरिक पर्यायांचा विचार करणे, या उपाययोजनांनाही बळ द्यावे लागेल. जेनेरिक औषधे लिहून देण्यामध्ये डॉक्टरांना कोणताही फायदा नसतो. तसेच डॉक्टर जी औषधं लिहून देतात ती त्यांच्याच औषधी दुकानात मिळतात, इतर ठिकाणी मिळत नाहीत, हे एक आश्चर्य म्हणावे लागेल. रुग्णाला औषधाच्या पर्यायांची, किंमतीची आणि त्याच्या उपचाराच्या आर्थिक परिणामांची माहिती मिळणे हा पारदर्शक आरोग्यव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, औषध क्षेत्रातील बिनहिशेबी आणि वारेमाप नफा कमावण्याच्या प्रवृत्तीला कायदेशीर आळा घालणे ही काळाची गरज आहे. बाजारव्यवस्थेला स्वातंत्र्य असले तरी जीवनरक्षक औषधांच्या बाबतीत राज्याची नियामक भूमिका अधिक मजबूत असली पाहिजे. कारण येथे ग्राहक हा नेहमीचा ग्राहक नसतो; तो अनेकदा वेदनेत असलेला रुग्ण असतो आणि त्याच्या हातात सौदेबाजीची ताकद नसते. औषध निर्मिती कंपन्या ह्या शासनाला आणि जनतेला बांधील आहेत. कारण त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, सूट आणि सबसिडी हे सर्व जनतेच्या पैशातून दिले जाते, याचा विसर ह्या कंपन्यांना पडलेला दिसतो. सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाने शासन आणि संबंधित नियामक यंत्रणांना आरसा दाखवला आहे. आता त्या आरशात दिसणाऱ्या वास्तवाकडे दुर्लक्ष न करता ठोस कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजना करण्याची वेळ आली आहे. औषध उद्योगाला नफा मिळू नये, असा प्रश्न नाही; पण कोणाच्याही जीवाच्या किंमतीवर अमर्याद नफा कमावण्याला मोकळे रान असू नये. कडक किंमत नियंत्रण, पारदर्शकता आणि प्रभावी कायदेशीर कारवाई यांच्यामुळे औषधांच्या नावाखाली होणारी रुग्णांची आर्थिक लूट थांबवता येऊ शकते. उपचार हा अधिकार आहे; तो आर्थिक शोषणाचे साधन बनू नये, एवढीच अपेक्षा.

बालपण फुलवू या : समृद्ध भविष्य घडवू या!



बालपण हा मानवी जीवनातील सर्वांत सुंदर, निरागस आणि संवेदनशील काळ असतो. या काळात मुलांच्या मनावर उमटणारे संस्कार, त्यांना मिळणारे अनुभव, शिक्षण, प्रेम, सुरक्षितता आणि प्रोत्साहन त्यांच्या संपूर्ण आयुष्याची दिशा ठरवतात. प्रत्येक बालकाच्या मनात असंख्य स्वप्ने असतात. कोणाला डॉक्टर व्हायचे असते, कोणाला शिक्षक, शास्त्रज्ञ, कलाकार, खेळाडू, तर कोणाला समाजासाठी काहीतरी वेगळे करून दाखवायचे असते. या स्वप्नांना आकार देण्याची जबाबदारी केवळ पालकांची किंवा शिक्षकांची नसून संपूर्ण समाजाची आहे. बालकांना आनंदी, सुरक्षित, निरोगी आणि सन्मानपूर्ण बालपण मिळाले, तरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. म्हणूनच बालपण फुलविणे म्हणजे केवळ मुलांचे संगोपन करणे नव्हे, तर संवेदनशील, समताधिष्ठित आणि समृद्ध समाजाच्या निर्मितीचा पाया मजबूत करणे होय.

भारतात दरवर्षी १४ नोव्हेंबर हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस बालदिन म्हणून ओळखला जातो. मुलांविषयी त्यांना विशेष जिव्हाळा होता. मुलांमध्ये देशाचे भविष्य पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यामुळे त्यांच्या जन्मदिनी बालदिन साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. बालदिन हा केवळ उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम किंवा मनोरंजनाचा दिवस नाही; तर बालकांचे हक्क, त्यांच्या समस्या, शिक्षणाच्या संधी, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि विकास यांचा गांभीर्याने विचार करण्याचा दिवस आहे. बालकांविषयी समाजाची भूमिका किती संवेदनशील आहे आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण काय करीत आहोत, याचे आत्मपरीक्षण करण्याची ही संधी आहे.

बालक हे समाजाचे केवळ भविष्य नसून वर्तमानाचाही महत्त्वाचा भाग आहेत. त्यांच्याकडे स्वतंत्र विचार, भावना, कल्पनाशक्ती आणि व्यक्तिमत्त्व असते. त्यामुळे मुलांना केवळ मोठ्यांच्या अपेक्षांनुसार घडविण्याऐवजी त्यांच्या क्षमता, आवडी आणि नैसर्गिक गुणांना वाव देणे आवश्यक आहे. प्रत्येक मूल वेगळे असते. काही मुले अभ्यासात प्रगती करतात, काही क्रीडा क्षेत्रात चमकतात, तर काहींची कलात्मक अभिव्यक्ती, निरीक्षणशक्ती किंवा नेतृत्वक्षमता विशेष असते. सर्व मुलांची तुलना एकाच निकषावर करणे अन्यायकारक आहे. मुलांच्या क्षमतांची ओळख करून त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देणे ही पालक, शिक्षक आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालकांच्या विकासामध्ये कुटुंब आणि शाळा या दोन संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. कुटुंब मुलांना प्राथमिक संस्कार, मूल्ये आणि सामाजिक वर्तन शिकवते, तर शाळा त्यांना ज्ञान, शिस्त, सहकार्य, नेतृत्व आणि सामाजिक जाणीव प्रदान करते. शिक्षक हा केवळ अभ्यासक्रम शिकविणारा घटक नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्यातील सुप्त गुण ओळखणे आणि आत्मविश्वास वाढविणे ही शिक्षकांची महत्त्वाची कामे आहेत. शिक्षणपद्धतीत पाठांतरापेक्षा अनुभवाधारित शिक्षण, प्रयोगशीलता, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि प्रत्यक्ष कृतीला अधिक महत्त्व दिले पाहिजे. मुलांना प्रश्न विचारण्याचे, स्वतःचे मत मांडण्याचे आणि नव्या कल्पना मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तर त्यांची विचारशक्ती अधिक विकसित होईल.

बालकांच्या बाबतीत मुलगा आणि मुलगी असा भेदभाव करणे ही सामाजिक प्रगतीला बाधा आणणारी वृत्ती आहे. अनेक कुटुंबांमध्ये आजही मुलांच्या शिक्षणाला अधिक महत्त्व दिले जाते, तर मुलींच्या शिक्षणाकडे दुय्यम दृष्टीने पाहिले जाते. मुलींवर घरकामाची जबाबदारी टाकणे, त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण करणे किंवा लहान वयात विवाह लावून देणे या प्रवृत्ती त्यांच्या स्वप्नांना मर्यादा घालतात. मुलींना शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षितता आणि निर्णयस्वातंत्र्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे मुलांनाही संवेदनशीलता, सहकार्य, समानता आणि स्त्री-पुरुष समानतेची मूल्ये शिकविणे आवश्यक आहे. लिंगभेदमुक्त बालपणातूनच समताधिष्ठित समाजाची निर्मिती होऊ शकते.

बालकांमध्ये सामाजिक आणि नैतिक मूल्यांची जडणघडण होणेही तितकेच आवश्यक आहे. प्रामाणिकपणा, सहकार्य, बंधुभाव, समता, सहिष्णुता, पर्यावरणप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्ये बालपणापासून रुजविली पाहिजेत. जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्तर यांवरून भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करण्याची शिकवण मुलांना मिळाली पाहिजे. घरातील आणि शाळेतील वातावरणात समता व परस्पर आदराची मूल्ये प्रत्यक्ष कृतीतून दिसली पाहिजेत. मुलांना केवळ उपदेश करून मूल्यशिक्षण देता येत नाही; तर मोठ्यांच्या वर्तनातून त्यांना त्याची अनुभूती मिळते. पालक, शिक्षक आणि समाजातील जबाबदार व्यक्तींनी स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे.

बालकांचे भविष्य घडविण्यात शासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे. शिक्षणाचा अधिकार, बालकांचे संरक्षण, पोषण, आरोग्य, महिला व बालविकासाशी संबंधित योजना आणि बालहक्कांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या विकासासाठी विविध प्रयत्न केले जातात. मात्र, योजनांची घोषणा पुरेशी नसून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी महत्त्वाची आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागांपर्यंत शासकीय सुविधा पोहोचल्या पाहिजेत. अंगणवाड्या, शाळा, आरोग्य केंद्रे आणि बालसंरक्षण यंत्रणा यांच्यात समन्वय असणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था, पालक संघटना आणि नागरिकांनीही बालविकासाच्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. बालकांच्या समस्यांकडे केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न म्हणून न पाहता सार्वजनिक धोरण आणि सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

शेवटी, बालपण फुलविणे ही केवळ भावनिक संकल्पना नसून सामाजिक परिवर्तनाची मूलभूत अट आहे. बालकांच्या चेहऱ्यावरील हास्य, त्यांच्या मनातील निर्भयता, डोळ्यांतील स्वप्ने आणि कृतीतील आत्मविश्वास हे समाजाच्या प्रगतीचे खरे मापदंड आहेत. ज्या समाजात मुलांना समान संधी, सुरक्षित वातावरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सन्मानाचे जीवन मिळते, तो समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध ठरतो. प्रत्येक घराने मुलांसाठी प्रेमळ वातावरण निर्माण करावे, प्रत्येक शाळेने त्यांच्यातील क्षमता विकसित करावी, प्रत्येक गावाने बालमैत्रीपूर्ण परिसर घडवावा आणि शासनाने त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कटिबद्ध राहावे. बालकांचे बालपण हिरावून न घेता त्यांना मुक्तपणे वाढू देणे, त्यांच्या स्वप्नांना दिशा देणे आणि त्यांच्या क्षमतांना संधी उपलब्ध करून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. कारण आज आपण ज्या पद्धतीने बालपण घडवू, त्याच पद्धतीने उद्याचा समाज आकाराला येईल. म्हणूनच बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक संकल्प करायला हवा की बालकांच्या हक्कांचा आदर करू, त्यांच्या स्वप्नांना बळ देऊ, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊ आणि त्यांच्या विकासासाठी सक्रिय योगदान देऊ. बालपण फुलले, तरच भविष्य समृद्ध होईल; आणि प्रत्येक बालक आनंदी झाले, तरच खऱ्या अर्थाने समाज प्रगत होईल.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली

सायबर फसवणुकीचे वाढते जाळे; डिजिटल युगात सावधानतेची गरज!



आजचे युग हे डिजिटल क्रांतीचे युग म्हणून ओळखले जाते. मोबाईल, इंटरनेट, ऑनलाइन बँकिंग, डिजिटल पेमेंट आणि सोशल मीडियामुळे मानवी जीवन अधिक गतिमान आणि सोयीस्कर झाले आहे. घरबसल्या आर्थिक व्यवहार करण्यापासून ते शासकीय योजनांचा लाभ घेण्यापर्यंत अनेक गोष्टी एका क्लिकवर शक्य झाल्या आहेत. मात्र, तंत्रज्ञानाच्या या प्रगतीसोबतच सायबर गुन्हेगारीचे प्रमाणही चिंताजनक वेगाने वाढत आहे.

डिजिटल सुविधांचा वापर वाढत असताना सायबर फसवणुकीचे जाळे अधिकाधिक व्यापक होत आहे. त्यामुळे तंत्रज्ञान जितके महत्त्वाचे, तितकीच डिजिटल सुरक्षिततेची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगार नवनवीन युक्त्या वापरून सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक गंडा घालत आहेत. बनावट फोन कॉल, खोटे बँक संदेश, फसव्या लिंक, बनावट वेबसाइट, ओटीपीची मागणी, केवायसी अपडेटच्या नावाखाली होणारी फसवणूक अशा अनेक माध्यमांतून नागरिकांची आर्थिक लूट केली जात आहे. विशेष म्हणजे, आता सायबर गुन्हेगार केवळ तांत्रिक त्रुटींचा फायदा घेत नाहीत, तर मानवी भावनांचा आणि भीतीचाही गैरफायदा घेत आहेत. पोलीस अधिकारी, बँक अधिकारी किंवा सरकारी विभागातील कर्मचारी असल्याचे भासवून नागरिकांना धमकावणे, डिजिटल अटक झाल्याचे सांगून पैसे उकळणे, अशा प्रकारांनी सायबर गुन्हेगारीने गंभीर स्वरूप धारण केले आहे.

शेअर बाजारात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष, ऑनलाइन गुंतवणुकीच्या बनावट योजना, नोकरीचे प्रलोभन, लॉटरी लागल्याचे संदेश आणि सोशल मीडियावरील बनावट मैत्री यांमधूनही अनेकांची फसवणूक होत आहे. कमी वेळेत अधिक पैसा मिळविण्याच्या हव्यासापोटी अनेक नागरिक अशा जाळ्यात अडकतात. काही वेळा सुशिक्षित आणि तंत्रज्ञानाची माहिती असलेले नागरिकही या फसवणुकीला बळी पडतात. त्यामुळे सायबर गुन्हेगारी ही केवळ अशिक्षित किंवा तंत्रज्ञानापासून दूर असलेल्या लोकांची समस्या राहिलेली नाही. ग्रामीण भागातही स्मार्टफोन आणि डिजिटल व्यवहारांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि छोटे व्यावसायिक हे डिजिटल व्यवहारांवर अवलंबून आहेत. मात्र, सायबर सुरक्षेविषयी पुरेशी माहिती नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना फसवणुकीचा धोका अधिक असतो.

शेतकऱ्यांना अनुदान, पीकविमा, कर्जमाफी किंवा सरकारी योजनेचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली बनावट संदेश पाठविले जातात. त्यामुळे डिजिटल साक्षरतेबरोबरच सायबर सुरक्षेचे प्रशिक्षण देणे ही काळाची गरज बनली आहे. सायबर फसवणूक झाल्यानंतर अनेक नागरिक तक्रार करण्यास घाबरतात किंवा संकोच करतात. परिणामी, गुन्हेगारांना आणखी वाव मिळतो. प्रत्यक्षात फसवणूक झाल्यानंतर वेळ न दवडता तातडीने तक्रार करणे महत्त्वाचे आहे. भारतात सायबर आर्थिक फसवणुकीची तक्रार करण्यासाठी १९३० हा राष्ट्रीय हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध आहे. तसेच राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टलवरही तक्रार नोंदविता येते. फसवणूक झाल्यास त्वरित १९३० वर संपर्क साधून आवश्यक तपशील द्यावेत सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ शासन आणि पोलीस यंत्रणेवर अवलंबून राहून चालणार नाही. प्रत्येक नागरिकाने स्वतःची डिजिटल सुरक्षा ही स्वतःची जबाबदारी मानली पाहिजे. कोणालाही ओटीपी, एटीएम पीन, पासवर्ड किंवा बँक खात्याची गोपनीय माहिती देऊ नये. अनोळखी व्यक्तींनी पाठविलेल्या लिंकवर क्लिक करू नये. संशयास्पद ॲप डाउनलोड करणे टाळावे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून स्क्रीन शेअरिंग प सुरू करू नये. ऑनलाइन गुंतवणूक करताना संबंधित संस्थेची अधिकृतता तपासावी.

सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती आणि आर्थिक तपशील शेअर करण्याबाबतही काळजी घ्यावशासनाने सायबर गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, पोलिस यंत्रणेला प्रशिक्षित करणे आणि सायबर गुन्ह्यांच्या तपासाला गती देणे आवश्यक आहे. बँकिंग क्षेत्रानेही संशयास्पद व्यवहार ओळखण्यासाठी अधिक प्रभावी यंत्रणा उभारली पाहिजे. शाळा, महाविद्यालये, ग्राम पंचायती आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून सायबर जनजागृती अभियान राबविणे गरजेचे आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली पाहिजेत.डिजिटल क्रांती ही विकासाची मोठी संधी आहे; मात्र तिचा सुरक्षित वापर झाला तरच तिचे खरे फायदे समाजाला मिळू शकतील. तंत्रज्ञानाचा वेग वाढत असताना सायबर गुन्हेगारीचे आव्हानही अधिक गुंतागुंतीचे होत आहे. त्यामुळे प्रत्येकाने डिजिटल व्यवहार करताना सतर्कता, संयम आणि विवेक बाळगणे आवश्यक आहे.

क्षणिक लोभ, भीती किंवा घाई यामुळे आयुष्यभराची कमाई गमावण्याची वेळ येऊ नये. शेवटी एवढेच की, सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात अडकण्यापेक्षा सावधगिरीचा मार्ग स्वीकारणे केव्हाही चांगले. डिजिटल व्यवहार करा, तंत्रज्ञानाचा लाभ घ्या; पण डोळे उघडे ठेवूनच! कारण सायबर सुरक्षितता ही केवळ तांत्रिक बाब नसून प्रत्येक नागरिकाच्या आर्थिक सुरक्षिततेचा आणि सामाजिक विश्वासाचा प्रश्न बनली आहे.

-प्रा. संजय बडे
दहेगाव ता. वैजापूर,
जि. छत्रपती संभाजी नगर
मो. ७८८८२९७८५९

मुलांनो मैदानात या...बालपण पुन्हा अनुभवू या!



आजचे युग हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युग म्हणून ओळखले जाते. एकविसाव्या शतकात स्मार्टफोन आणि इंटरनेट हे मानवी जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसांकडेच नव्हे, तर शाळकरी मुलांच्या हातातही आज मोबाईल दिसू लागला आहे. कोरोना महामारीच्या काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी मुलांना मोबाईल घेऊन दिले. मात्र, कोरोना संपल्यानंतरही हा मोबाईल मुलांच्या हातातून सुटलेला नाही. उलट मोबाईल हाच मुलांचा सर्वांत जवळचा मित्र बनला आहे.

सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक मुले मोबाईलमध्ये गुंतलेली असतात. मोबाईलचा वापर आजच्या काळात आवश्यक असला, तरी तो गरजेपुरताच मर्यादित असणे अपेक्षित आहे. मात्र, आज अनेक मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व बनले आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल, टीव्ही, संगणक, व्हिडिओ गेम आणि सोशल मीडियावर घालवत असतील, तर त्यांच्या शारीरिक हालचाली कमी होणारच. याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर, अभ्यासावर आणि सामाजिक वर्तनावरही होत आहे. मुलांचे बालपण हरवत चालले आहे की काय, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावोगावची मैदाने मुलांच्या किलबिलाटाने गजबजून जायची. क्रिकेट, कबड्डी, खो-खो, लगोरी, लंगडी अशा खेळांमध्ये मुले रमून जायची. मात्र, आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात हीच मैदाने ओस पडल्याचे चित्र दिसत आहे. क्रिकेटचा अपवाद वगळता अनेक मैदानी खेळ खेळताना मुले फारशी दिसत नाहीत. पारंपरिक देशी खेळ तर आजच्या पिढीला माहीतही नाहीत.

गोट्या, भोवरे, विटीदांडू, आट्यापाट्या, सुरपारंब्या, लपंडाव, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू यांसारखे अनेक खेळ आजच्या मुलांच्या आयुष्यातून हद्दपार होत चालले आहेत. पूर्वी दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक काढणारी मुले दिसायची. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून रप्पाधप्पी खेळला जायचा. गोट्यांचा डाव रंगायचा. या खेळांमध्ये मुलांना मिळणारा आनंद अवर्णनीय होता. मात्र, आज अशा खेळांची जागा मोबाईलवरील व्हिडिओ गेम्सनी घेतली आहे.

खरे तर मैदानी खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नाहीत, तर मुलांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहेत. मैदानी खेळांमुळे शरीराचा व्यायाम होतो, शारीरिक क्षमता वाढते आणि मानसिक आरोग्यही चांगले राहते. त्याचबरोबर संघभावना, शिस्त, सहकार्य, नेतृत्व, खिलाडूवृत्ती, जिद्द आणि पराभव स्वीकारण्याची मानसिकता असे अनेक जीवनोपयोगी गुण मुलांमध्ये विकसित होतात. मोबाईलवरील खेळांमधून मनोरंजन मिळत असले, तरी प्रत्यक्ष मैदानावर खेळण्याचा आनंद आणि त्यातून मिळणारे अनुभव वेगळेच असतात.

मुलांना मैदानापासून दूर ठेवण्यात केवळ मोबाईलच जबाबदार नाही, तर खेळण्यासाठी सुरक्षित मैदाने आणि पुरेशी जागा उपलब्ध नसणे, अभ्यासाचा वाढता ताण आणि पालकांची बदललेली जीवनशैली हीदेखील काही कारणे आहेत. त्यामुळे मुलांना पुन्हा मैदानाकडे वळवण्यासाठी पालक, शिक्षक, शाळा आणि समाजातील सर्व घटकांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. शाळांमध्ये खेळांसाठी पुरेसा वेळ द्यावा. गावोगावी मैदाने उपलब्ध करून द्यावीत. पालकांनीही मुलांना मोबाईल देऊन शांत बसवण्यापेक्षा त्यांच्यासोबत मैदानी खेळ खेळण्याचा प्रयत्न करावा.

तंत्रज्ञानाला विरोध करण्याची गरज नाही; मात्र तंत्रज्ञानाचे गुलाम होण्यापासून मुलांना वाचवण्याची गरज आहे. मोबाईल मुलांच्या ज्ञानात भर घालणारे साधन ठरावे, त्यांच्या बालपणाचा शत्रू नव्हे. मुलांच्या हातात मोबाईलसोबतच खेळाचे साहित्यही दिसले पाहिजे. त्यांचे बालपण चार भिंतींच्या आत नव्हे, तर मोकळ्या मैदानात फुलले पाहिजे.

चला तर मग, मुलांनो मोबाईल बाजूला ठेवा, घराबाहेर पडा आणि मैदानात या! पुन्हा एकदा गोट्या, भोवरे, विटीदांडू, कबड्डी, खो-खो आणि लगोरीचे डाव रंगू द्या. कारण निरोगी शरीर आणि आनंदी बालपण हीच मुलांची खरी संपत्ती आहे!

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे

जलसंधारणासाठी सेवा समर्पण परिवार व ग्रामस्थांच्या पुढाकाराने कामनगावात राज्यस्तरीय दुसरा पाणी सप्ताह

विविध माान्यवरांच्या उपस्थितीत १५ नोव्हेंबरपासून पाणी सप्ताहाला होणार प्रारंभ

भोकर (प्रतिनिधी)– पाण्याचे महत्त्व केवळ पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतरच लक्षात येऊ नये, तर भविष्यातील पाणी संकट टाळण्यासाठी आजपासूनच जलसंधारणाची लोकचळवळ उभी राहणे गरजेचे आहे. हाच दूरदृष्टीचा विचार डोळ्यांसमोर ठेवून भोकर तालुक्यातील कामनगाव येथील सेवा समर्पण परिवार व समस्त ग्रामस्थांनी पुढाकार घेत राज्यस्तरीय दुसऱ्या 'पाणी सप्ताहा'चे आयोजन केले आहे.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून राबविण्यात येणारा हा उपक्रम संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरणार असून, कामनगावने निर्माण केलेला हा आदर्श जिल्ह्यातील प्रत्येक गावाने घेण्याची आज नितांत गरज आहे. दिनांक १५ ते २२ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत कामनगाव येथे हा पाणी सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. सेवा समर्पण परिवार व समस्त ग्रामस्थ कामनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात जलसंधारणाच्या विविध कामांसह सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक विधायक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या सप्ताहाचे उद्घाटन विधानपरिषद सदस्य हेमंत पाटील यांच्या हस्ते होणार असून, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

या राज्यस्तरीय पाणी सप्ताहासाठी भोकर तालुक्यातील विविध प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व उद्योजकांना निमंत्रित करण्यात आले आहे. यामध्ये महंत उत्तमवन महाराज (दत्त संस्थान कैलास गड, भोकर), तहसीलदार विनोद गुंडमवार, तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव, गट विकास अधिकारी शेखर देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी संदेश जाधव, गटशिक्षणाधिकारी अजित तरवटे, अध्यक्ष सेवा समर्पण परिवार दिगंबरराव देशमुख, सत्यप्रभाचे संपादक संतोष पांडागळे, लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी श्रीनिवास भोसले, जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस बाळासाहेब पाटील सावणगावकर, उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, सभापती जगदीश पाटील भोसीकर, सभापती शिरीषराव देशमुख, नगराध्यक्ष भगवानराव दंडवे, जि. प. सभापती प्रकाशराव देशमुख, आणि उद्योजक सर्जेराव पाटील ढगे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या पाणी सप्ताहाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे केवळ भाषणे आणि जनजागृतीपुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष कृतीवर भर देण्यात आला आहे. जलतारा उभारणी, सीसीटी खोदकाम, माती नाला बांध, दगडी बांध, गॅबियन बंधारे, वृक्षारोपण आणि ग्रामस्वच्छता अशा विविध कामांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे, मृदसंधारण करणे आणि गावाला जलसमृद्ध बनविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

शासनाच्या योजनांची वाट पाहण्यापेक्षा गावाच्या विकासासाठी गावकऱ्यांनीच पुढाकार घेतला, तर किती मोठा सकारात्मक बदल घडू शकतो, याचे उदाहरण कामनगावने निर्माण केले आहे.

पाणी सप्ताहाच्या कालावधीत दररोज सकाळी ७ ते ११ या वेळेत श्रमदान, दुपारी १२ ते २.३० या वेळेत व्याख्यान, दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत पुन्हा श्रमदान, तर रात्री ७.३० ते ९.३० या वेळेत कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. जलसंधारणाविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संत-महात्म्यांच्या विचारांतून सामाजिक प्रबोधन आणि प्रत्यक्ष श्रमदान अशा त्रिसूत्रीच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये पाणी संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्यांसाठी हिवाळी अधिवेशनात आवाज उठविणार –आ. हेमंत पाटील

डॉ. हंसराज वैद्य यांच्या नेतृत्त्वाखाली फेस्कॉमच्या शिष्टमंडळाची आमदारांशी भेट



नांदेड (प्रतिनिधी)– ज्येष्ठ नागरिकांच्या प्रलंबित घटनात्मक मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न अत्यंत गांभीर्याने मांडून त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा विश्वास विधान परिषदेचे आमदार हेमंत पाटील यांनी दिला. दीपावलीच्या मुहूर्तावर उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉमच्या वतीने डॉ. हंसराज वैद्य यांच्या नेतृत्वाखाली आमदार पाटील यांची भेट घेऊन ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनातील मागण्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रस्तावित असलेल्या 'लाडके मायबाप योजना' या संकल्पनेचा विशेष उल्लेख केला. ही योजना प्रत्यक्षात लागू व्हावी आणि त्या अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक त्या सर्व सुविधा मिळाव्यात, यासाठी आपण आग्रही राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्येष्ठ नागरिकांसाठी वयाची मर्यादा ६० वर्षेच ग्राह्य धरावी आणि ज्येष्ठ नागरिक ही देशाची राष्ट्रीय संपत्ती असल्याचेही त्यांनी मान्य केले.

केंद्र सरकारचे ज्येष्ठ नागरिकांसंदर्भातील पारीत कायदे व नियमांची काटेकोर अंमलबजावणी, एसटी आणि रेल्वे प्रवासात सवलती, निराधार व गरजू ज्येष्ठ नागरिकांना आधारकार्डाच्या माध्यमातून थेट मानधन, स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक मंत्रालय व आयोग, जिल्हास्तरावर ज्येष्ठ नागरिक भवन, तसेच तालुका आणि शहरातील प्रत्येक प्रभागात विरंगुळा केंद्र सुरू करण्याच्या मागण्यांना त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

याशिवाय ज्येष्ठ नागरिकांना संपूर्ण आरोग्य कवच, करमुक्ती, विधिमंडळ व संसदेत फेस्कॉममधून ज्येष्ठ नागरिक समूहाला प्रतिनिधित्व, तसेच फेस्कॉम अध्यक्षासह फेस्कॉमच्या सर्व प्रादेशिक अध्यक्षांचा संतुलन राखण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महामंडळात समावेश करण्याच्या मागण्यांनाही त्यांनी अनुकूलता दर्शविली.

ज्येष्ठ नागरिकांचे कुटुंबाला ओझे न वाटता सन्मानाने जगता यावे, यासाठी हयातीत नियमित मानधन आणि निधनानंतर अंत्यसंस्कारासाठी 'अंत्यसंस्कार विधी सहाय्यता निधी' मिळणे आवश्यक असल्याचेही आमदार पाटील यांनी मान्य केले. त्यामुळे आता 'लाडके मायबाप योजना' प्रत्यक्षात येण्याच्या ज्येष्ठ नागरिकांच्या आशा अधिक पल्लवित झाल्या आहेत.

अखिल भारतीय छावा संघटनेच्या १९ व्या सगर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– अखिल भारतीय छावा संघटना, महाराष्ट्र राज्याच्या वतीने कै. देवराव बापू काकडे यांच्या स्मरणार्थ आयोजित १९ व्या सगर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बुधवार, दि. ११ नोव्हेंबर २०२६ रोजी हनुमान मंदिर, जुना कौठा, नांदेड येथे पार पडलेल्या या स्पर्धेत शेतकरी, पशुपालक, सगरप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अखिल भारतीय छावा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली आयोजित स्पर्धेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबईचे गोविंदराव पावडे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे माजी संचालक अविनाश कदम, नॅशनल प्रेस फोरमचे महाराष्ट्र प्रभारी तथा तेजपुंज साप्ताहिकाचे संपादक अरविंद जाधव, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गणेश पाटील शिंदे, छावा संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष दशरथ कपाटे, नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, माजी नगरसेवक राजू गोरे, कौठा येथील पोलीस पाटील साहेबराव काळे आणि राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त पोलीस पाटील खंडेराय बकाल यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच राम पहिलवान सगर समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

स्वरगंध संगीत मंचाचा पाचवा वर्धापनदिन; 'तारों की बरसात सुरों के साथ' कार्यक्रम



नांदेड (प्रतिनिधी)– नांदेड शहरातील संगीतप्रेमींसाठी दिवाळीच्या उत्साहात सुरांची अनोखी मेजवानी घेऊन 'तारों की बरसात सुरों के साथ' या संगीतमय दिवाळी संगीत कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. स्वरगंध संगीत मंच, नांदेडच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित हा विशेष कार्यक्रम सायंकाळी ६ ते रात्री १० या वेळेत कुसुम सभागृह, व्हीआयपी रोड, नांदेड येथे रंगणार आहे.

स्वरगंध संगीत मंच, नांदेड हा गेल्या अनेक वर्षांपासून नांदेडच्या सांस्कृतिक व संगीत क्षेत्रात कार्यरत असून नवीन आणि अनुभवी कलाकारांना सोबत घेऊन संगीताची वाटचाल करीत आहे. विशेष म्हणजे नवोदित कलाकारांना गायनाची संधी देऊन त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मंच सातत्याने प्रयत्नशील आहे.

मंचाच्यापाचव्यावर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय व सदाबहार गीते, सुपरहिट बॉलीवूड साँग्स तसेच धमाकेदार संगीत रचना सादर केल्या जाणार आहेत.

या कार्यक्रमात प्रमुख गायक म्हणून गोविंद कंधारे, डॉ. चंद्रशेखर किसवे, राजन करकरे, सुभाष जोंधळे, डॉ. विनोद केचकर, गजानन वाळूकर, प्रदीप सूर्यवंशी, गणेश नाईकवाडे, ललिता दुलगच, दीपाली चौधरी, प्रियंका बोधनकर, आकांक्षा मोतेवार आणि प्रतीक्षा किंगरे हे कलाकार विविध गीतं सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उद्योजक अनिल शेटकर यांच्या हस्ते होणार असून, गोदातीर समाचारचे संपादक केशव घोणसे पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचे निर्माता साईनाथ लिंगाडे, संयोजक लक्ष्मीकांत लिंगाडे, सहनिर्माते शिवाजी टाक व संतोष टाक असून कार्यक्रमाची संकल्पना आंबादास पार्डीकर यांची आहे. कार्यक्रमाचे नियोजन आंबादास पार्डीकर करीत असून, संजय काचावर, जोगेंद्र दुलगज आणि दत्ता पारवेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

स्वरगंध संगीत मंचाच्या या पाचव्या वर्धापनदिन सोहळ्याला नांदेडमधील संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल दिवाळी धमाक्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हा परिषदेतून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषदेत पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

शासन निर्णयानुसार आयोजित करण्यात येणाऱ्या या पेन्शन अदालतीत सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, अर्ज आणि निवेदनांवर चर्चा करून त्यांच्या पेन्शनविषयक अडचणींचे निराकरण करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता ही अदालत जिल्हा परिषद येथे पार पडणार आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याची मागणी

किनवट (प्रतिनिधी)– केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनाही १ जुलै २०२६ पासून तीन टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा, तसेच मागील चार महिन्यांची थकबाकी चालू महिन्याच्या वेतनासोबत रोखीने अदा करावी, अशी मागणी शासकीय व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी समन्वय समिती, तालुका समन्वय किनवट-माहूर यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ९ नोव्हेंबर २०२६ रोजी निवेदन सादर केले आहे. निवेदनात केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात तीन टक्क्यांची वाढ मंजूर करून तो ६० टक्क्यांवरून ६३ टक्के केला आहे. त्याच धर्तीवर राज्य कर्मचाऱ्यांनाही वाढीव महागाई भत्ता लागू करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्य कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२६ पासून तीन टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करून जुलै ते ऑक्टोबर या चार महिन्यांची थकबाकी नोव्हेंबर २०२६ च्या वेतनासोबत अदा करावी. यामुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक अडचण दूर होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करून शासनाने या मागणीला तातडीने मंजुरी द्यावी, असे आवाहन समितीच्यावतीने तालुका समन्वयक एस. एस. धानोरकर यांनी केले आहे.

एलसीबीची मानसपुरीत धडक कारवाई; तिर्रट अड्यावर छापा, ११ जागीच पकडले, ४ फरार



नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने मानसपुरी शेतशिवार येथे सुरू असलेल्या बेकायदेशीर तिर्रट जुगार अड्यावर धाड टाकून एकूण ४ लाख ३ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दि. ७ नोव्हेंबर रोजी प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा नांदेडच्या आदेशाने पोलीस पथक हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, कंधार ते उस्माननगर जाणाऱ्या रोडवर मानसपुरी शेतशिवारातील मोकळ्या जागेत काही इसम बेकायदेशीररीत्या 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत आहेत. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलीस पथकाने सदर ठिकाणी जाऊन कारवाई केली असता आरोपी शेख नूर मोहम्मद शेख बाबुमिया, वय २१ वर्षे, रा. बहादरपुरा, ता. कंधार, शेख रब्बानी शेख मौलाना, वय ५० वर्षे, रा. हतईपुरा कंधार, मरीबा लक्ष्मण वाघमारे, वय ५२ वर्षे, रा. बळीरामपूर, ता. जि. नांदेड, उत्तम दिगांबर गिरडे, वय ४२ वर्षे, रा. असदवन, ता. जि. नांदेड, महेंद्र बळीराम कोल्हे, वय ४० वर्षे, रा. संभाजी चौक, सिडको, बालाजी धोंडीराम गोवंदे, वय ४० वर्षे, रा. सुगाव, ता. जि. नांदेड, शिवाजी बाबुराव ससाणे, वय ४० वर्षे, रा. आनंद नगर, देगलूर, अरुण गौतम लोहकरे, वय ३८ वर्षे, रा. वाघाळा, ता. जि. नांदेड, देवीदास व्यंकटराव घोगरे, वय ४५ वर्षे, रा. असदवन, नांदेड, अनिष कचरू घोगरे, वय ३९ वर्षे, रा. वाघाळा, नांदेड, विजय पांडुरंग कोकरे, वय ४५ वर्षे, रा. कामळज, ता. मुदखेड, दीपक खैरे, रा. वाघाळा, नांदेड (फरार), संग्राम मोरे, रा. गोपाळचावडी, नांदेड (फरार), दादाराव जाधव, रा. हडको (फरार), राजू शिवाजी इंगेवाड, रा. वाघाळा (फरार) यांचा समावेश आहे.

आरोपींकडून व घटनास्थळावरून पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करून १ रॉयल एनफिल्ड बुलेट (MH-२६-CZ-२६९७) अंदाजे किंमत २ लाख रुपये, १ मोटारसायकल (MH-२६-CD-६९०४) अंदाजे किंमत ६० हजार रुपये, विविध कंपनीचे सात मोबाईल फोन अंदाजे किंमत ८९ हजार १०० रुपये, रोख रक्कम ५४ हजार ५२० रुपये व जुगाराचे साहित्य असा एकूण ४ लाख ३ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नमूद आरोपींवर कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४२०/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड विभागातून धावणाऱ्या तीन गाड्यांच्या डब्यांतील संरचनेत कायमस्वरूपी बदल

नांदेड (प्रतिनिधी)– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने प्रवाशांच्या सुविधेसाठी तीन रेल्वेगाड्यांच्या डब्यांतील संरचनेत कायमस्वरूपी बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये नांदेड-तिरुचानूर-नांदेड एक्स्प्रेस आणि नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस-नांदेड एक्स्प्रेस (दोन गाड्या -सोमवार आणि बुधवारी) या गाड्यांचा समावेश आहे.

एका त्रितीय श्रेणी वातानुकुलीत शयनयान डब्याऐवजी एक द्वितीय श्रेणी शयनयान डबा (स्लीपर) समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे सुधारित संरचनेत वातानुकूलित प्रथम श्रेणी, वातानुकूलित चेअर कार, वातानुकुलीत तृतीय श्रेणी, वातानुकुलीत द्वितीय श्रेणी, शयनयान आणि इतर असे एकूण २२ डबे असतील.

गाडी क्रमांक १७६३३/१७६३४ नांदेड-तिरुचानूर-नांदेड एक्स्प्रेस: या गाडीच्या डब्यांच्या संरचनेतील बदलाची अंमलबजावणी नांदेडहून सुटणाऱ्या गाडीसाठी १९ डिसेंबर २०२६ पासून, तर तिरुचानूरहून सुटणाऱ्या गाडीसाठी २० डिसेंबर २०२६ पासून करण्यात येणार आहे.

गाडी क्रमांक १७६६५/१७६६६ नांदेड-लोकमान्य टिळक टर्मिनस एक्स्प्रेस-नांदेड (सोमवार) : या गाडीच्या डब्यांच्या संरचनेतील बदलाची अंमलबजावणी नांदेडहून सुटणाऱ्या गाडीसाठी २१ डिसेंबर २०२६ पासून, तर मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटणाऱ्या गाडीसाठी २२ डिसेंबर २०२६ पासून करण्यात येणार आहे.

रब्बी हंगामातील पिकांना विमा संरक्षण; नांदेड जिल्ह्यात पीक विमा नोंदणी सुरू

नांदेड (प्रतिनिधी)– प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२६-२७ अंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण मिळावे, यासाठी पीक विमा नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १८७ शेतकऱ्यांनी विमा नोंदणी केली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी मुदतीपूर्वी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

या योजनेत ज्वारी पिकासाठी ३० नोव्हेंबर २०२६, तर गहू, हरभरा आणि मका पिकांसाठी १५ डिसेंबर २०२६ ही विमा नोंदणीची अंतिम मुदत आहे. शेतकऱ्यांना विमा हप्त्यापोटी रब्बी हंगामासाठी विमा संरक्षित रकमेच्या केवळ १.५ टक्के तर खरीप व रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी ५ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. ज्वारीसाठी हेक्टरी ३६ हजार रुपये विमा संरक्षित रक्कम असून, शेतकरी हिस्सा ५४० रुपये आहे. गव्हासाठी ४५ हजार रुपये संरक्षित रकमेवर ६७५ रुपये, हरभऱ्यासाठी ३६ हजार रुपये, संरक्षित रकमेवर ४६८ रुपये, तर मक्यासाठी ५० हजार रुपये, संरक्षित रकमेवर ५०० रुपये विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अधिसूचित क्षेत्रांमध्ये संबंधित पिकांसाठी ही योजना लागू राहणार आहे. योजनेत कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होणे ऐच्छिक आहे. खातेदार शेतकऱ्यांसह कुळाने अथवा भाडेतत्त्वावर शेती करणारे शेतकरीही पात्र असून, भाडेपट्ट्याने शेती करणाऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांकडे ग्रीस्टॅक शेतकरी ओळख क्रमांक असणे अनिवार्य आहे. यासोबतच आधार कार्ड, बँक पासबुक, पीक पेरा स्वयंघोषणापत्र, सातबारा, आठ अ आवश्यक आहे. तसेच पीक नुकसान भरपाईसाठी ई-पीक पाहणीअंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक आहे. सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये शेतकरी सहभागासाठी प्रती अर्ज किमान ०.१० हेक्टर मर्यादा राहील.

या योजनेची अंमलबजावणी इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. नववा मजला, ऑफिस ए, नेक्सस वेस्टेंड, सेक्टर १, बिल्डींग ए, सर्वे नंबर १६९/१, परिहार चौकाजवळ, डीपी रोड, औंध, पुणे-४११००७ (ई-मेल : supportagrieffcotokio.co.in) मार्फत करण्यात येणार आहे. इच्छुक बिगर कर्जदार शेतकऱ्यांना राष्ट्रीयीकृत बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था, आपले सरकार सेवा केंद्र तसेच विमा कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी व मध्यस्थांमार्फत विमा अर्ज आणि विमा हप्ता सादर करता येईल. पीक विमा योजनेत सहभागी होताना चुकीची कागदपत्रे, बोगस सातबारा उतारे किंवा बनावट भाडेकरार सादर केल्यास संबंधितांवर कायदेशीर व फौजदारी कारवाई करण्यात येणार असून, अशा प्रकरणांत कृषी विभागाच्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ पाच वर्षांसाठी बंद करण्यात येऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य कागदपत्रांसह विहित मुदतीत पीक विमा नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

दुष्काळाचा सामना संयम व एकजुटीने करूया -आ. चिखलीकर

लोहा तालुक्यातील ९९ गावे व ८० वाडी-तांडे, नगर यातील पाणीटंचाईसाठी २१ कोटींचा आराखडा



लोहा (प्रतिनिधी)– गावोगावी पाण्याची भीषणता निर्माण होणार आहे. दुष्काळी परिस्थिती पाहता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गावात जाऊन समस्या जाणून घ्याव्यात व शक्य तिथेच त्याचे निराकरण करावे. या दुष्काळाचा सामना सर्वांनी संयमाने व एकजुटीने करूया. कामात हलगर्जीपणा करू नये. कामचुकारपणा करणाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही, असे निर्देश आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिले.

लोहा तहसील कार्यालयात जानेवारी ते जून २०२७ या काळातील संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा बैठक आ. चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, युवानेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, बीडीओ सुधीश मांजरमकर, सचिन पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी सभापती शंकर पाटील, पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता डी. बी. बनसोडे, महावितरणचे उपअभियंता नामदेव सुतार, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, गणेश पाटील बगाडे, ज्ञानेश्वर पाटील पवार, अर्जुन राठोड, भगवान राठोड, मारोती पाटील बोरगावकर, बी. डी. जाधव, बाबाराव पाटील गवते, उद्धव पाटील चितळीकर यांच्यासह सरपंच, प्रशासक, अभियंता, तलाठी व कर्मचारी उपस्थित होते.

आ. चिखलीकर यांनी लोहा तालुक्यातील ९९ गावांच्या पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला. ज्या गावात जलजीवनची ७५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत, तिथे पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश दिले. ग्रामपंचायतीने १५ व्या वित्त आयोगातून विंधन विहीर दुरुस्ती आदी कामे करावीत. शक्य तेवढी पाणी व्यवस्था गावातच अधिग्रहण करावी. टँकर हा शेवटचा पर्याय असेल, असे त्यांनी सांगितले.

पाणीपुरवठ्याच्या कामात घाई करू नका, नागरिकांना पाणी मिळाले पाहिजे. जिथे डीपीची गरज असेल तिथे माझ्या आमदार निधीतून डीपी देऊ, असेही त्यांनी जाहीर केले. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक यांच्यासह सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहून नागरिकांची कामे करावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या.

शेलगाव व जोशीसांगवी येथील जलजीवन योजनेच्या कामाबाबत या बैठकीत तक्रारी मांडण्यात आल्या. त्यामुळे तहसीलदार, बीडीओ व अभियंत्यांच्या पथकाने या योजनेची चौकशी करावी, असे आदेश काढण्याचे निर्देश आ. चिखलीकर यांनी दिले.

तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

जिओ, एअरटेल, व्हीआय की बीएसएनएल?

कोणाचा कॉलिंग प्लॅन सर्वांत स्वस्त? 22 दिवसांपासून वर्षभरापर्यंतचे दर जाणून घ्या!

मोबाइल ग्राहकांसाठी जिओ, एअरटेल, व्होडाफोन-आयडिया (व्हीआय) आणि बीएसएनएल या दूरसंचार कंपन्यांनी इंटरनेट सुविधेशिवाय केवळ व्हॉइस कॉलिंगसाठी स्वस्त रिचार्ज योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे कमी इंटरनेट वापरणाऱ्या आणि प्रामुख्याने फोनवर बोलण्यासाठी मोबाइल वापरणाऱ्या ग्राहकांना दिलासा मिळू शकतो. मात्र, या चार कंपन्यांपैकी सर्वांत स्वस्त कॉलिंग योजना कोणाची आहे, असा प्रश्न ग्राहकांसमोर आहे.

दूरसंचार नियामक प्राधिकरणाच्या (ट्राय) निर्देशांनंतर सर्वप्रथम एअरटेलने, त्यानंतर व्होडाफोन-आयडियाने स्वतंत्र कॉलिंग योजना सादर केल्या. पुढे जिओ आणि अखेरीस बीएसएनएलनेही अशा योजना ग्राहकांसाठी उपलब्ध केल्या. या कंपन्यांच्या योजनांमध्ये २२ दिवसांपासून ते वर्षभरापर्यंतच्या वैधतेचे पर्याय आहेत. विविध कंपन्यांच्या योजनांची तुलना केल्यास सुरुवातीच्या कमी किमतीच्या योजनेत जिओ आघाडीवर आहे. मात्र, २८ आणि ३० दिवसांच्या योजनांसह मासिक आणि ८० ते ८४ दिवसांच्या वैधतेच्या योजनांमध्ये बीएसएनएलचे दर तुलनेने कमी आहेत. वार्षिक योजनेच्या बाबतीत मात्र एअरटेल आणि व्हीआयच्या योजना स्वस्त ठरतात.



सुरुवातीच्या योजनेत जिओ सर्वांत स्वस्त

कमी किमतीच्या कॉलिंग योजनेचा विचार केल्यास जिओने २२ दिवसांच्या वैधतेची योजना उपलब्ध करून दिली आहे. या योजनेत ३०० एसएमएसची सुविधाही मिळते. याउलट व्होडाफोन-आयडियाची सर्वांत स्वस्त कॉलिंग योजना १७९ रुपयांपासून सुरू होते. तिची वैधता २५ दिवसांची आहे. एअरटेलची सुरुवातीची योजना १८५ रुपयांची असून, तिची वैधता २८ दिवसांची आहे. त्यामुळे सुरुवातीच्या किमतीचा विचार करता जिओची योजना सर्वांत स्वस्त ठरते.

28 आणि 30 दिवसांच्या योजनेत बीएसएनएलची बाजी

२८ दिवसांच्या वैधतेच्या अमर्यादित कॉलिंग योजनांची तुलना केल्यास जिओ १७७ रुपयांत, तर बीएसएनएल १७२ रुपयांत योजना देते. एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियाच्या याच कालावधीच्या योजनांसाठी प्रत्येकी १८५ रुपये मोजावे लागतात. त्यामुळे २८ दिवसांच्या वैधतेसाठी बीएसएनएलचा पर्याय सर्वांत स्वस्त आहे. ३० दिवसांच्या योजनेतही बीएसएनएल आघाडीवर आहे. बीएसएनएलची ३० दिवसांची योजना १८४ रुपयांना उपलब्ध आहे. जिओसाठी १९६ रुपये, तर एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियासाठी प्रत्येकी २०३ रुपये खर्च करावे लागतात.

संपूर्ण महिन्याच्या योजनेत कोण स्वस्त?

कॅलेंडर महिन्याच्या वैधतेच्या म्हणजे एका तारखेपासून पुढील महिन्यातील त्याच तारखेपर्यंत चालणाऱ्या योजनांचा विचार केल्यास बीएसएनएलची योजना १९० रुपयांना उपलब्ध आहे. जिओसाठी १९७ रुपये, तर एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियासाठी प्रत्येकी २०६ रुपये मोजावे लागतात. त्यामुळे संपूर्ण महिन्याच्या वैधतेच्या कॉलिंग योजनेत बीएसएनएल सर्वांत स्वस्त आहे. खासगी दूरसंचार कंपन्यांमध्ये जिओचा पर्याय तुलनेने कमी किमतीचा आहे.

80 ते 84 दिवसांच्या योजनेतही बीएसएनएल स्वस्त



दीर्घकाळासाठी रिचार्ज करण्यास प्राधान्य देणाऱ्या ग्राहकांसाठी ८० ते ८४ दिवसांच्या वैधतेच्या योजनाही उपलब्ध आहेत. या गटात बीएसएनएलची ८० दिवसांची योजना ४३९ रुपयांना मिळते. खासगी कंपन्यांमध्ये जिओची ८४ दिवसांची योजना ४४८ रुपयांना उपलब्ध आहे. एअरटेलसाठी ४६९ रुपये, तर व्होडाफोन-आयडियासाठी ४७० रुपये मोजावे लागतात. त्यामुळे या कालावधीच्या योजनांमध्ये बीएसएनएल सर्वांत स्वस्त ठरते. खासगी कंपन्यांमध्ये जिओचा पर्याय किफायतशीर आहे.

वार्षिक योजनेत एअरटेल आणि व्हीआय स्वस्त

वर्षभर मोबाइल क्रमांक सक्रिय ठेवू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठीही कंपन्यांनी दीर्घ मुदतीच्या योजना उपलब्ध केल्या आहेत. जिओची ३३६ दिवसांची कॉलिंग योजना १ हजार ७४८ रुपयांना उपलब्ध आहे. दुसरीकडे, एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियाच्या ३६५ दिवसांच्या योजनांसाठी प्रत्येकी १ हजार ८४९ रुपये खर्च करावे लागतात. म्हणजेच एअरटेल आणि व्हीच्या योजनांची वैधता जिओपेक्षा २९ दिवसांनी अधिक असून, त्यांची किंमतही तुलनेने कमी आहे. त्यामुळे वार्षिक वैधतेच्या दृष्टीने या दोन्ही कंपन्यांचे पर्याय ग्राहकांसाठी फायदेशीर ठरतात.

कोणती योजना निवडावी?

कमी खर्चात सुरुवातीचा रिचार्ज करायचा असल्यास जिओचा पर्याय स्वस्त आहे. २८ दिवस, ३० दिवस, संपूर्ण महिना किंवा ८० ते ८४ दिवसांची योजना हवी असल्यास बीएसएनएलचे दर कमी आहेत, तर वर्षभराची वैधता हवी असल्यास एअरटेल आणि व्होडाफोन-आयडियाच्या योजना अधिक किफायतशीर ठरतात. त्यामुळे केवळ रिचार्जची किंमत न पाहता वैधतेचा कालावधी, कॉलिंग सुविधा, एसएमएस आणि आपल्या वापराच्या गरजा लक्षात घेऊन योग्य योजना निवडणे ग्राहकांसाठी फायद्याचे ठरेल.

कोणता हीटर सर्वाधिक वीज वापरतो?

ब्लोअर, रॉड की ऑइल हीटर; खरेदी करताना कोणता पर्याय ठरेल फायदेशीर?

थंडीचा कडाका वाढू लागला की घराघरात हीटरचा वापर सुरू होतो. बाजारात सध्या ब्लोअर, हॅलोजन रॉड हीटर आणि ऑइल फिल्ड रेडिएटर असे विविध प्रकार उपलब्ध आहेत. मात्र, हीटर खरेदी करताना केवळ त्याची किंमत पाहणे पुरेसे नाही. तो किती वीज वापरतो आणि त्याचा वीजबिलावर किती परिणाम होतो, हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. काही हीटर कमी वेळात खोली गरम करतात, तर काही दीर्घकाळ उष्णता टिकवून ठेवतात. त्यामुळे आपल्या गरजेनुसार योग्य हीटर निवडणे आवश्यक आहे.



ब्लोअर हीटर

सिरॅमिक फॅन हीटर किंवा ब्लोअर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हीटरची क्षमता साधारणपणे १,५०० ते २,००० वॅट असते. या हीटरमधील विद्युत गुंडाळी गरम होते आणि त्याला जोडलेला पंखा गरम हवा संपूर्ण खोलीत पसरवतो. या प्रकारच्या हीटरमुळे खोली कमी वेळात गरम होते. मात्र, त्याचा वीजवापरही अधिक असतो. उदाहरणार्थ, २,००० वॅट क्षमतेचा ब्लोअर दररोज पाच ते सहा तास सुरू ठेवल्यास सुमारे १० ते १२ युनिट वीज वापरली जाऊ शकते. त्यामुळे ब्लोअर वापरणाऱ्या ग्राहकांच्या वीजबिलात वाढ होण्याची शक्यता असते.

ऑइल हीटर

ऑइल फिल्ड रेडिएटर हीटरची क्षमता साधारणपणे २,००० ते २,५०० वॅट असते. त्यामुळे हा हीटर सर्वाधिक वीज वापरत असेल, असा अनेकांचा समज असतो. मात्र, त्याची कार्यपद्धती वेगळी आहे. या हीटरमध्ये विशेष तेल भरलेले असते. ते एकदा गरम झाल्यानंतर बराच काळ उष्णता टिकवून ठेवते. तसेच, खोलीतील तापमान ठरावीक पातळीवर पोहोचल्यानंतर त्यातील स्वयंचलित तापमान नियंत्रक (थर्मोस्टॅट) वीजपुरवठा तात्पुरता बंद करतो. तापमान कमी झाल्यानंतर हीटर पुन्हा सुरू होतो. त्यामुळे हीटर पाच तास सुरू ठेवला असला, तरी या कालावधीतील प्रत्यक्ष वीजवापर कमी असू शकतो. दिलेल्या अंदाजानुसार, पाच तासांच्या वापरात हा हीटर सुमारे २ ते २.५ तास पूर्ण क्षमतेने वीज वापरू शकतो. त्यानुसार सरासरी वीजवापर प्रतितास सुमारे १ ते १.२५ युनिट असू शकतो. या हीटरमुळे खोलीत तुलनेने समान तापमान राखण्यास मदत होते. तसेच, ब्लोअरप्रमाणे थेट हवेचा झोत निर्माण होत नसल्याने खोलीतील हवेचा ओलावा कमी होण्याचा त्रास तुलनेने कमी असतो.

हॅलोजन रॉड हीटर किती वीज वापरतो?

नळी किंवा दांड्यांच्या स्वरूपातील हॅलोजन हीटर साधारणपणे ८०० ते १,२०० वॅट क्षमतेचे असतात. यामध्ये एक किंवा दोन स्वतंत्र दांड्यांची व्यवस्था असते. गरजेनुसार एका दांड्याचा किंवा दोन्ही दांड्यांचा वापर करता येतो. एका दांड्याची क्षमता साधारण ४०० वॅट असल्यास दोन्ही दांडे सुरू केल्यानंतर एकूण वीजवापर ८०० वॅट होतो. क्षमतेनुसार हा हीटर एका तासात साधारण ०.८ ते १.२ युनिट वीज वापरू शकतो. या हीटरचे वैशिष्ट्य म्हणजे तो संपूर्ण खोली गरम करण्याऐवजी त्याच्या समोर बसलेल्या व्यक्तीला थेट उष्णता देतो. त्यामुळे ब्लोअरच्या तुलनेत त्याचा वीजवापर कमी असतो. मात्र, हीटर बंद केल्यानंतर उष्णता फार काळ टिकत नाही.

कोणता हीटर खरेदी करणे फायदेशीर?

- कमी वेळासाठी वापर करायचा असल्यास : रात्री झोपण्यापूर्वी एक ते दोन तास खोलीतील थंडी कमी करण्यासाठी हीटर हवा असल्यास ८०० वॅट क्षमतेचा हॅलोजन हीटर हा कमी वीज वापरणारा पर्याय ठरू शकतो.
- खोली लवकर गरम करायची असल्यास : कमी वेळात गरम हवा हवी असल्यास ब्लोअर उपयुक्त ठरतो. मात्र, त्याची क्षमता अधिक असल्याने वीजवापर आणि बिल वाढू शकते.
- दीर्घकाळ उष्णता हवी असल्यास : रात्रभर किंवा अनेक तास खोलीतील तापमान टिकवून ठेवण्याची गरज असल्यास ऑइल फिल्ड रेडिएटरचा विचार करता येईल. त्यातील तेल उष्णता टिकवून ठेवत असल्याने तापमान नियंत्रकाच्या मदतीने वीजवापर कमी होऊ शकतो.



हे लक्षात ठेवा!

हीटरची निवड करताना त्याची वॅट क्षमता, खोलीचा आकार, वापरण्याचा कालावधी आणि वीजदर यांचा विचार करावा. केवळ हीटरची किंमत कमी आहे म्हणून तो फायदेशीर ठरतोच असे नाही. प्रत्यक्ष वीजवापर आणि उष्णता देण्याची क्षमता यांची तुलना करणे महत्त्वाचे आहे. हीटर वापरताना तो ज्वलनशील वस्तू, पडदे आणि अंथरुणापासून सुरक्षित अंतरावर ठेवावा. विद्युत जोडणी योग्य क्षमतेची असावी. हीटर झाकू नये आणि वापरात नसताना तो बंद करावा. सुरक्षितता आणि वीजबचत या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊनच हीटरची निवड करणे योग्य ठरेल.

तेलाच्या मदतीने खोली कशी गरम करतो ऑइल हीटर?

हिवाळ्यात घर उबदार ठेवण्यासाठी अनेकजण रॉड किंवा ब्लोअर हीटरचा वापर करतात. मात्र, ऑइल फिल्ड रेडिएटर अर्थात ऑइल हीटर हा तुलनेने कमी चर्चेत असलेला पर्याय आहे. विशेष म्हणजे, हा हीटर तेलाच्या मदतीने उष्णता निर्माण करून संपूर्ण खोली उबदार ठेवतो. त्याची कार्यपद्धती, वीजवापर आणि किंमत समजून घेतल्यास तो आपल्या गरजेसाठी योग्य आहे की नाही, हे ठरवता येते.

ऑइल हीटरमध्ये विशेष प्रकारचे उष्णतारोधक तेल वापरले जाते. या तेलाला डायइलेक्ट्रिक किंवा थर्मल ऑइल म्हणतात. हीटर सुरू केल्यानंतर त्यातील विद्युत घटक तेल गरम करतो. हे तेल गरम झाल्यानंतर हीटरच्या धातूच्या पट्ट्यांमध्ये उष्णता पसरवते. त्यामुळे आजूबाजूची हवा गरम होऊन संपूर्ण खोलीत उब निर्माण होते. या तेलाचा वापर इंधन म्हणून होत नसल्याने ते जळत नाही किंवा संपत नाही. त्यामुळे त्यात वारंवार तेल भरण्याची गरज नसते. हा हीटर तुलनेने शांतपणे काम करतो. तसेच, तो खोलीतील प्राणवायू जाळत नाही.

ऑइल हीटर खरेदी करणे फायदेशीर आहे का?



सामान्य रॉड किंवा ब्लोअर हीटरच्या तुलनेत ऑइल हीटरची सुरुवातीची किंमत अधिक असते. त्याची किंमत साधारण सात ते बारा हजार रुपयांपासून सुरू होऊ शकते. मात्र, दीर्घकाळ वापर, शांत कार्यपद्धती आणि तापमान नियंत्रकाची सुविधा यामुळे तो चांगला पर्याय ठरू शकतो. विशेषतः अनेक तास खोली उबदार ठेवायची असल्यास ऑइल हीटरचा विचार करता येईल. मात्र, तो रात्रभर सुरू ठेवताना उत्पादकाने दिलेल्या सुरक्षितता सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. थोडक्यात सांगायचे तर, कमी वेळासाठी आणि कमी खर्चात उष्णता हवी असल्यास रॉड किंवा ब्लोअर हीटर उपयोगी ठरतो. मात्र, दीर्घकाळ खोलीतील तापमान टिकवायचे असल्यास ऑइल हीटर अधिक सोयीस्कर पर्याय ठरू शकतो. खरेदीपूर्वी त्याची क्षमता, वीजवापर, किंमत आणि सुरक्षिततेची वैशिष्ट्ये तपासावीत.

दिल्लीतील 16 वर्षीय विद्यार्थ्याची कमाल!

अवघ्या 140 रुपयांत पंख्याचे केले एअर प्युरिफायरमध्ये रूपांतर; 90 टक्क्यांपर्यंत प्रदूषण कमी करण्याचा दावा

वाढत्या वायुप्रदूषणामुळे दिल्लीकरांचे आरोग्य धोक्यात आले असताना, एका १६ वर्षीय विद्यार्थ्याने अत्यंत कमी खर्चात हवेचे प्रदूषण कमी करण्याचा अभिनव उपाय शोधला आहे. कृष अग्रवाल असे या विद्यार्थ्याचे नाव असून, त्याने मित्र समर्थ मित्तल याच्या सहकार्याने केवळ १४० रुपये खर्चात सामान्य पंख्याचे हवा शुद्ध करणाऱ्या यंत्रात रूपांतर करणारा विशेष गाळणी संच तयार केला आहे. या प्रयोगामुळे महागडे हवा शुद्धीकरण यंत्र विकत घेणे परवडत नसलेल्या सर्वसामान्य कुटुंबांनाही दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या अभिनव संशोधनाची दखल घेत कृषला २०२६ चा 'डायना पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे.





- काय आहे प्रोजेक्ट वायू? : कृष अग्रवाल आणि समर्थ मित्तल यांनी एकत्रितपणे प्रोजेक्ट वायू साकारला. यात सामान्य पंख्याला जोडता येईल अशी विशेष गाळणी तयार करण्यात आली आहे. या गाळणीमध्ये विद्युतभारित तंतूंचा वापर करण्यात आला आहे. हवेत असलेले प्रदूषित घटक, धूलिकण आणि अतिसूक्ष्म कण अडकवण्याची क्षमता या तंतूंमध्ये असल्याचे सांगण्यात आले आहे. पंखा सुरू केल्यानंतर हवेच्या प्रवाहामुळे ही गाळणी फुग्यासारखी फुगते. त्यामुळे हवा गाळण्याचा पृष्ठभाग वाढतो आणि खोलीतील हवा या गाळणीतून प्रवाहित होताना त्यातील प्रदूषक कण अडकवले जातात. परिणामी, खोलीतील हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.
- पीएम २.५ प्रदूषणात ९० टक्क्यांपर्यंत घट? : या विशेष गाळणीची बंद खोलीत चाचणी घेण्यात आली. या चाचणीदरम्यान हवेतील पीएम २.५ या अतिसूक्ष्म प्रदूषक कणांचे प्रमाण सुरुवातीला प्रतिघनमीटर १५८ मायक्रोग्रॅम होते. गाळणीसह पंखा एक तास सुरू ठेवल्यानंतर हे प्रमाण कमी होऊन प्रतिघनमीटर ११ मायक्रोग्रॅमवर आले. म्हणजेच चाचणीतील नोंदीनुसार प्रदूषणाच्या प्रमाणात सुमारे ९३ टक्क्यांची घट झाली. या प्रयोगाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण गाळणी तयार करण्यासाठी अवघे १४० रुपये खर्च येतो. त्यामुळे कमी खर्चात हवेतील प्रदूषक कण कमी करण्याचा हा पर्याय ठरू शकतो. मात्र, प्रत्यक्ष वापरात त्याची परिणामकारकता खोलीचा आकार, हवेचा प्रवाह आणि बाहेरील प्रदूषण यांसारख्या घटकांवर अवलंबून राहू शकते.
- शाळांमधील विद्यार्थ्यांनाही फायदा : प्रोजेक्ट वायू अंतर्गत तयार केलेल्या गाळण्या शाळांमध्ये मोफत वितरित करण्यात येत आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात ६०२ गाळण्या तयार करून २९५ वर्गखोल्यांमध्ये बसविण्यात आल्या. त्यामुळे सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांना तुलनेने स्वच्छ हवा मिळण्यास मदत झाल्याचे वृत्त आहे. आता दिल्लीतील आणखी ४५ शाळांमध्ये या गाळण्या बसविण्याची तयारी सुरू आहे. या उपक्रमाचा आतापर्यंत दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना फायदा झाल्याचे सांगण्यात आले आहे. वापरानुसार या गाळण्या वेळोवेळी बदलण्याची सुविधाही आहे.
- कृषला 'डायना पुरस्काराने' गौरव : अत्यंत कमी खर्चात प्रदूषण कमी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकणारा अभिनव प्रयोग केल्याबद्दल कृष अग्रवाल याला २०२६ च्या प्रतिष्ठित 'डायना पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले आहे. वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्याने केलेल्या या प्रयोगामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्ती, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. महागड्या तंत्रज्ञानालाच पर्याय मानण्याऐवजी उपलब्ध साधनांचा कल्पक वापर करून सामान्यांच्या समस्यांवर उपाय शोधता येतो, हे कृषने आपल्या प्रयोगातून दाखवून दिले आहे. विशेषतः वाढत्या वायुप्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर त्याचा हा प्रयत्न कौतुकास्पद ठरत आहे.

राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ मध्ये महाराष्ट्राच्या विदित गुजराती, दिव्या देशमुख यांना अर्जुन पुरस्कार



नवी दिल्ली (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू विदित संतोष गुजराती आणि दिव्या जितेंद्र देशमुख यांना अर्जुन पुरस्कार, नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चौहान यांना द्रोणाचार्य पुरस्कार, तर पुण्यातील आर्मी पॅरालिम्पिक नोड या संस्थेला राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बुद्धिबळातील आंतरराष्ट्रीय यश, नेमबाजीतील उत्कृष्ट प्रशिक्षण आणि दिव्यांग सैनिकांच्या क्रीडा पुनर्वसनातील उल्लेखनीय योगदानाच्या जोरावर महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ मध्ये आपली ठळक छाप उमटवली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आज आयोजित विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नाशिकचा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू विदित संतोष गुजराती याने बुद्धिबळ क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बुडापेस्ट येथे झालेल्या ४५ व्या फिडे बुद्धिबळ ऑलिंपियाड २०२४ मध्ये सुवर्णपदक, हांगझाऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक त्याने मिळवले आहे तसेच आयल ऑफ मॅन येथे झालेल्या फिडे ग्रँड स्विस २०२३ स्पर्धेत सुवर्णपदक मिळविण्याची कामगिरी त्याने केली आहे. त्याच्या या आंतरराष्ट्रीय यशाची दखल घेत त्याला अर्जुन पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

नागपूरची युवा आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू दिव्या जितेंद्र देशमुख हिनेही आपल्या उल्लेखनीय कामगिरीने महाराष्ट्राचा गौरव वाढविला आहे. ४५व्या फिडे बुद्धिबळ ऑलिंपियाड २०२४ मध्ये दोन सुवर्णपदके, अलमाटी येथे झालेल्या २०२३ च्या आशियाई खंडीय महिला बुद्धिबळ स्पर्धेत सुवर्णपदक आणि २०२२ मध्ये दिल्ली येथे झालेल्या स्पर्धेत कांस्यपदक मिळविण्याची कामगिरी तिने केली आहे. तिच्या या यशस्वी क्रीडा प्रवासाचा गौरव अर्जुन पुरस्काराने करण्यात आला.

महाराष्ट्राच्या महेश भागवत यांची हैदराबादच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती



हैदराबाद (प्रतिनिधी)– तेलंगणा सरकारनं गुरुवारी २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. या बदल्यानंतर पोलीस प्रशासनात मोठे बदल झाले आहेत. महाराष्ट्रातील अहिल्यानगरचे मूळचे रहिवासी असलेले आयपीएस महेश भागवत यांची हैदराबादचे नवीन पोलीस आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तेलंगणा राज्याचे मुख्य सचिव संजय जाजू यांनी २१ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्तीचे आदेश जारी केले आहेत. हैदराबादचे पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत असलेले व्ही. सी. सज्जनार यांची बदली करून त्यांची 'अग्निशमन आणि आपत्ती प्रतिसाद' विभागाचे महासंचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे 'विशेष सुरक्षा दला'च्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभारही असेल. तर त्यांच्या जागी महेश भागवत यांची पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महेश भागवत १९९५ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन भारतीय पोलीस सेवेत सामील झाले. मुळ पाथर्डीचे असलेल्या भागवत यांचे आई-वडील शिक्षक होते. पाथर्डीच्या विद्या मंदिरात त्यांनी प्राथमिक शिक्षण तर पुण्यातून सिव्हील इंजिनिअरींग केले. मानवी तस्करी रोखण्यात अभिनव पद्धतीने प्रयत्न करणारे आयपीएस अधिकारी महेश भागवत यांना अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने २०१७ चा टीआयपी रिपोर्ट हिरो पुरस्कार देऊन गौरवलं होतं. प्रेसिडेंट मेडल्स मिळवण्याबरोबरच त्यांना अनेक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत

पोलीस प्रशासनातील फेरबदलाचा भाग म्हणून, चारू सिन्हा यांची 'लाचलुचपत प्रतिबंधक विभागा'च्या महासंचालकपदी, तर एस. चंद्र शेखर रेड्डी यांची याच विभागाचे संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अकून सभरवाल यांची अतिरिक्त महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) म्हणून नियुक्ती झाली आहे. अनिल कुमार यांची 'तेलंगणा राज्य मार्ग परिवहन महामंडळा'चे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर स्वाती लाक्रा यांची 'कारागृह विभागा'च्या महासंचालकपदी आणि सौम्या मिश्रा यांची 'महिला सुरक्षा विभागा'च्या महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवरायांची ऐतिहासिक वाघनखे आजपासून मुंबईत

मुंबई (प्रतिनिधी)– छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेली ऐतिहासिक वाघनखे आणि मराठा साम्राज्याच्या शौर्यपरंपरेची साक्ष देणारा दुर्मिळ शस्त्रखजिना पाहण्याची मोठी संधी आता मुंबईकरांना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाच्या वतीने आयोजित 'शिवशस्त्रशौर्यगाथा' या आंतरराष्ट्रीय शस्त्रप्रदर्शनाचा चौथा आणि अंतिम टप्पा आज (शुक्रवार, १३ नोव्हेंबर) मुंबईत सुरू होत आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात या प्रदर्शनाचे दिमाखदार उद्घाटन होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या ३५० व्या वर्षानिमित्त राज्यभर विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबवण्यात आले. याच उपक्रमाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून लंडन येथील व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट (त) संग्रहालयातून शिवरायांशी संबंधित ऐतिहासिक वाघनखे भारतात आणण्याचा यशस्वी करार करण्यात आला. १६ व्या ते १८ व्या शतकातील मराठा योद्ध्यांचा पराक्रम, त्यांची युद्धपरंपरा आणि शस्त्रकला नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने 'शिवशस्त्रशौर्यगाथा' हे भव्य प्रदर्शन साकारण्यात आले आहे.

शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेड

मुख्य कार्यालय, नवा मोंढा नांदेड

(नमुना झेड)

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) अन्वये स्थावर मालमता ताबा नोटीस

जसे की,

ज्या अर्थी शंकर नागरी सहकारी बँक लि.नांदेड मुख्य कार्यालय नांदेड बँकेचे वसुली अधिकारी असुन त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ अन्वये **कर्जदार मे.श्रीराम फर्टीलायझर्स प्रो.प्रा.श्रीराम बाबुराव कोडगिरे (मयत), यांचे वारस श्रीमती पद्मीनीबाई श्रीराम कोटगिरे जमानतदार व गहाणदार श्री देविदास शामराव बरगळे,** यांना दि.०४.१०.२०२५ रोजी मागणी नोटीस (Demand Notice) बजावुन, नोटीसीच्या प्राप्त दिनांकापासुन १० दिवसाच्या आत रु.५६,१७,६४३/- (अक्षरी रुपये छपन्न लाख सतरा हजार सहाशे त्रैचाळीस केवळ) व त्यापुढील होणारे व्याज व इंतर खर्चासहित थकित कर्ज भरण्याची सुचना दिली होती.

तथापी उपरोक्त थकबाकीदारांनी कर्ज रक्कमेची परतफेड न केल्यामुळे बँकेमार्फत दि.२४.११.२०२५ रोजी स्थावर मालमत्तेच्या जप्ती पुर्वीची नोटीस जारी करण्यात आली असुन खाली नमुद केलेल्या स्थावर मालमत्तेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

त्याअर्थि कर्जदार मालमत्ताधारक व सर्वसामान्य जनतेस या नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, वरीष्ठहस्ताक्षरी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ (११) (ड-१) अन्वये दि.११.१२.२०२५ रोजी खालील वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेचा सांकेतिक ताबा (Symbolic Possession) घेतला आहे.

कर्जदार मालमत्ता गहाणदार व सर्व जनतेस याव्दारे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करु नये या मालमत्तेच्या कोणताही व्यवहार केल्यास शंकर नागरी सहकारी बँक लि.नांदेड बँकेचा रु.५६,१७,६४३/- व त्यावरील व्याज व वसुली खर्चासहीत कर्जाच्या रोजा रक्कमेस अधिन राहावे लागेल.

-: ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील :-

१) मौजे मानसपुरी ता.कंधार जि.नांदेड हद्दीतील शेत गट क्रं-५७/B मधील १ हेक्टर ११ आर शेतजमीनपैकी, गाव नमुना ७/१२ वर अस्तित्वात असलेली ० हेक्टर ५४ आर शेतजमीन श्री देविदास शामराव बरगळे यांच्या नावाची आहे.

चर्तुसीमा :-पुर्व- लालवाडी शिव पश्चिम- गट क्रं-५१ उत्तर- गट क्रं-५२ दक्षिण गट क्रं-५८

स्वाक्षरित/-
विशेष वसुली अधिकारी
शंकर नागरी सहकारी बँक लि; नांदेड
मुख्य कार्यालय, नवा मोंढा, नांदेड
मो.क्र.९०९६५४५१२९

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



जाहीर प्रगटन

मौजे कामळा (खु.) ता.जि. नांदेड गट नं. २११ मधील ४७ आर. ही शेतजमीन सय्यद सलीम सय्यद जानी व २) गट नं. २१२ मधील ३९.८१ आर. शेतजमीन सय्यद सिद्धीकी सय्यद सलीम व सय्यद समीर सय्यद सलीम यांच्या मालकीची जमीन शिवाजी इंगळे रा. आनंदनगर, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

शेतजमिनीची चतुःसिमा- पूर्वेस - कामठा-गाडेगाव शिवरस्ता, पश्चिमेस - नागपूर-तुळजापूर वळण रस्ता, दक्षिणेस - कामठा-गाडेगाव शिवरस्ता व उत्तरेस - प्रभू धोंडीबा तिडके यांचे शेत.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील शेतजमिनीबद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर शेतजमिनीचे खरेदीखत श्री शिवाजी इंगळे यांच्या नावे करून घेण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन.

जाहीर प्रगटन देणार
शिवाजी इंगळे
रा. आनंदनगर, नांदेड
मो.नं. ९८९०४८८९६५

जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार नामे मोहम्मद अब्दुल जमीम रिजवान पि. मोहम्मद अब्दुल नईम, रा.उमर कॉलनी, भारत मेडीकलच्या जवळ, देगलूर नाका, नांदेड यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरुन खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

१) माझ्या पक्षकाराचे वडील अब्दुल नईम पीर मोहम्मद हे दि.०६/०२/२०२६ रोजी मरण पावले आहेत व तसेच आई असमत सुलताना भ्र. अब्दुल नईम यांचे सुध्दा दि.१८/०७/२०१७ रोजी निधन झाले आहे.

२) माझ्या पक्षकाराच्या आई-वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारस खालीलप्रमाणे आहेत.

१) महमद अब्दुल अलीम पि.अब्दुल नईम, २) महमद अब्दुल रहीम पि. अब्दुल नईम, ३) महमद अब्दुल हकीम पि.अब्दुल नईम, ४) महमद अब्दुल कलीम पि. अब्दुल नईम, ५) महमद अब्दुल जमीम पि.अब्दुल नईम (माझे पक्षकार), ६). महमद अब्दुल मुस्तखीम रयान पि. अब्दुल नईम सर्व रा. घर म.न.पा.९-६-२०१, भारत मेडीकल जवळ, उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड

३) माझे पक्षकार व त्यांचे वरील पाच भाऊ हे सहाजण कायदेशीर वारस म्हणून खालील जायदादींचे एकत्र मालक व कब्जेदार आहेत.

१) घर म.न.पा.क्रं.९-६-२०१, क्षेत्रफळ १८०० चौरस फुट ज्यावर दुमजली आर.सी.सी. घर आहे. स्थीत भारत मेडीकलच्या जवळ, उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड

२) प्रिंट पॅक इंडस्ट्री, प्लॉट क्रं.बी-३/८, ३) सेफ पॅक ईडस्ट्री, प्लॉट क्रं.बी-३/७

४) आदर्श ईडस्ट्री, प्लॉट क्रं.बी-३/७

तिन्ही स्थीत, सिप्टा कोटेड कं.च्या समोर एम.आय.डी.सी.नांदेड, ५) सेफ पॅक इंडस्ट्रीज, प्लॉट क्रं. सी/६. कृष्णूर औद्योगिक वसाहत, कृष्णूर ता. नायगाव जि.नांदेड ६) एच.आर.पॉलीमर्स प्लॉस्टीक इंडस्ट्री, निजाम शुगर फॅक्टरीच्या समोर, सारंगपूर, निजामाबाद (तेलंगाना). ४) माझ्या पक्षकाराचे वरील भाऊ, माझ्या पक्षकारास वरील सर्व जायदादींपासून बेकायदेशीरपणे वंचित ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत व वरील जायदादी बेकायदेशीरपणे विकण्याचा आणि बँकेत गहाण ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

तरी सर्व जनतेस व संबंधित बँकांना कळविण्यात येते की, वरील जायदादींबद्दल खरेदी, विक्री, गहाण, भाडेपत्र ई. कोणत्याही प्रकारचा व्यवहार माझ्या पक्षकाराच्या वरील भावांबरोबर करू नये केल्यास तो पूर्णपणे बेकायदेशीर होईल व माझ्या पक्षकारावर अजिबात बंधनकारक राहणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक : ०९/११/२०२६
ठिकाण : नांदेड

तर्फे
अॅड. म. अ. रहमान सिद्दीकी
रा. विसावा नगर, नांदेड
मो. ९०४९७७९४६८

जाहीर प्रगटन देणार,
मोहम्मद अब्दुल जमीम
पि. अब्दुल नईम
रा.उमर कॉलनी,नांदेड

Change In Name

My old name is **KHALSA HARPREETSINGH VITHALSIGHKHALSA** Which now I am changing to my new name **HARPREET SINGH VITHAL SINGH KHALSA.** henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address - S/o vithal singh khalsa, ghar no 1-13-981 nandigram society town market nanded maharashtra 431601

Change In Name

My Old Name **SANKET SUHASRAO DESPANDE** which now I am changing as New Name **SANKET SUHAS DESPANDE** Hence forth, my all correspondence will be done as per my New Name please consider this public declaration.

Address: SANKET SUHAS DESPANDE R/o. Hudco New Nanded. Near Ram Mandir, Hudco, Nanded-431603. State - Maharashtra Mob: 9975825068

Change In Name

मी माझे नाव (जुने नाव) **Md Tauseef Md Rafi** यावरून बदलून (नवीन नाव) **Md Tauseef Mohammad Rafi** असे केले आहे.

यापुढे कृपया माझे नाव **Md Tauseef Mohammad Rafi** असेच ग्राह्य धरावे.

वरील नावाची अचूकता आणि त्यासंबंधित सर्व जबाबदारी माझी स्वतःची राहील.

पत्ता: १/१७/१८३४, हजरत पीर बुरहान नगर, गल्ली क्र. १९, तरोडा बु., जिल्हा नांदेड ४३१६०५.

Change In Name

My old name is **KASIM KHAN** Which now I am changing to my new name **SHAIKH KASIM SAB** henceforth all his official correspondence will be done as per the new name. Please consider this public declaration.

Address: S/O SHAIKH KASIM SAB H NO 1-13-986 PEER NAGAR NEAR MOHAMADIYA MASJID NANDED-431605

जाहीर प्रगटन

माझे पक्षकार डॉ. हरीराम साहेबराव गडदे रा. मु.पो. तातूर ता. जिल्हा तातूर पि. 413512 जाहीर प्रगटन देतो की, मी सागर प्रतापराव देशमुख रा. हणेगाव ता.देगलूर जि. नांदेड यांच्याकडून त्यांच्या मालकीची हाणेगाव स्थीत जमीन गट नं. 104 पैकी 0हे. 20 आर जमीन ज्यावर सागर देशमुख यांनी अकृषीक परवानगी घेऊन बांधकाम केले असून

त्यांच्या चतुर्सिमा सध्या खालीलप्रमाणे आहे.

उत्तर - रामकृष्ण भिमराव राणे यांची जमीन
दक्षिण - बाळकृष्ण भिमराव राणे यांची जमीन
पुर्व - विक्री दराचे शिल्लक जमीन
पश्चिम - रोड

हणेगाव ग्रामपंचायत मालमत्ता **मिळकत क्रं. 2286 क्षेत्र 21780 चौरस फुट** असे आहे. ही मिळकत मी सागर देशमुख यांच्याकडून खरेदी करण्याचा करार केला असून एकुण रक्कमपैकी काही रक्कम त्यांना अग्रीम दिलेली आहे. बाकी रक्कम खरेदीखताच्या वेळी देऊन खरेदीखत करुन घेण्याचे ठरले.

करिता हया जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, वरील व्यवहाराबदल कुणाचे आक्षेप असतील किंवा मिळकतीबदल कुणाचे हक्क अधिकार, बोजा असेल किंवा कायदयान्वये कुणाचे हक्क अधिकार असतील तर संबंधीतानी प्रस्तूत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसापर्यंत ठोस पुराव्यानिशी माझ्याकडे लेखी आक्षेप देऊन / पाठवून पोंच घ्यावी.

वरील कालावधीत कायदेशीर हक्क अधिकार असल्याबाबतचा आक्षेप प्राप्त न झाल्यास कुणाचाही हक्क अधिकार नाही असे गृहित धरुन खरेदी व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर आलेले आक्षेप माझ्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

करीता हे जाहीर प्रगटन.

तर्फे
अॅड कृष्णा गोपाळराव जोशी
देगलूर न्यायालय देगलूर

जाहीर प्रगटन देणार
डॉ. हरीराम साहेबराव गडदे

जाहिर प्रगटन

बिलोली येथील श्री ज्ञा.सु.निंबाळकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग बिलोली यांचे न्यायालयात.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २४० / २०२६

अर्जदार : विजय पि. साहेबराव टाकळीकर (कांबळे)

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक मौ ग्रा.पं.का टाकळी खुर्द / बिलोली

मागणी : जन्म मृत्यू नोंदणी सुधारित कायदा, २०२६ कलम ३(अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणेबाबत.

ज्याअर्थी,

अर्जदार नामे विजय पि. साहेबराव टाकळीकर (कांबळे) वय ५५ वर्षे रहणार- टाकळीखुर्द ता. बिलोली जि. नांदेड यांनी जन्म मृत्यू नोंदणी सुधारीत कायदा २०२६ चे कलम ३(अ) प्रमाणे, वडिल मयत साहेबराव उर्फ साहेबराव रंगीबा कांबळे यांचा जन्म / मृत्यू दिनांक 02/ 06 /२०२६ रोजी टाकळीखुर्द येथे झाल्याची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेशीत करण्यात यावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जदारास वरील आदेश देण्याकरीता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास सदरहू जाहीर प्रगटन तारखेच्या ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वत: किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्म / मृत्यू दिनांकाची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहिर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीचा तारीख 02 / 0| / २०२७ रोजी ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक 07 / 11 /२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

सहायक अधिक्षक,
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बिलोली

जाहिर प्रगटन

बिलोली येथील श्री ज्ञा.सु.निंबाळकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग बिलोली यांचे न्यायालयात.

इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. २४१ / २०२६

अर्जदार : विजय पि. साहेबराव टाकळीकर (कांबळे)

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक मौ ग्रा.पं.का टाकळीखुर्द / बिलोली

मागणी : जन्म मृत्यू नोंदणी सुधारित कायदा, २०२६ कलम ३(अ) प्रमाणे जन्माची नोंद घेणेस आदेश करणेबाबत.

ज्याअर्थी,

अर्जदार नामे विजय पि. साहेबराव टाकळीकर (कांबळे) वय ५५ वर्षे रहणार- टाकळीखुर्द ता. बिलोली जि. नांदेड यांनी जन्म मृत्यू नोंदणी सुधारीत कायदा २०२६ चे कलम ३(अ) प्रमाणे, आई-कलावतीबाई उर्फ कुलावतीबाई साहेबराव कांबळे यांचा जन्म / मृत्यू दिनांक 18 / 04 /2024 रोजी टाकळीखुर्द येथे झाल्याची नोंद घेणेसाठी गैरअर्जदार यांना आदेशीत करण्यात यावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

अर्जदारास वरील आदेश देण्याकरीता कोणाचाही आक्षेप असल्यास किंवा तक्रार असल्यास सदरहू जाहीर प्रगटन तारखेच्या ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वत: किंवा वकिलामार्फत आपले म्हणणे मांडावे. मुदत संपल्यानंतर गैरअर्जदारास अर्जदाराच्या जन्म / मृत्यू दिनांकाची नोंदणी करणेचा आदेश दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. करिता हे जाहिर प्रगटन दिले आहे.

पुढील सुनावणीचा तारीख 02 / 0| / २०२७ रोजी ठेवण्यात आली आहे.

आज दिनांक 07 / 11 /२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

सहायक अधिक्षक,
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बिलोली

जाहीर प्रगटण

सर्व जनतेस व सर्व संबंधीतास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, दि.टिळक नगर को-ऑप.हौसिंग सोसायटी (म.) नांदेड येथील वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड सर्व्हे क्र.38 वर ज्याचा सि.स.नं.8441 आहे. संस्थेचे मुळ प्लॉटधारक श्री लव मोहनराव व श्री कुश मोहनराव देशमुख यांच्या प्लॉट क्र.6 च्या भागावर श्री योगेश्वर कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रो.प्रा.हणमंत तुकाराम रपकाळ रा.लक्ष्मीनारायण नगर, नांदेड यांनी बांधकाम केलेल्या एकदंत अपार्टमेंट या ईमारतीतील यांचे हिश्याचे ताब्यामधील फ्लॅट क्र.401 लिहुन घेणार / खरेदीदार श्री नागनाथ मधुकर कागणे यांना कायमचा विक्री केलेला आहे.

ज्याची एकुण चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे आहे. पुर्वेस - फ्लॅट क्र.402 व पायऱ्या आहेत, पश्चिमेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री अंभोरे व बुलबुले यांची मिळकत 18545 आहे., दक्षिणेस - मोहन अपार्टमेंट ईमारत आहे., उत्तरेस - मार्जिनल मोकळी जागा आहे व नंतर श्री मुत्तलवार यांचे पी.आर.कार्ड क्र.18513 वरील घर आहे.

उपरोक्त वर्णनाच्या फ्लॅट क्र.401 हा श्री नागनाथ मधुकर कागणे, वय ४२ वर्षे, व्यवसाय नौकरी रा.हिबाट मोटरगा ता.मुखेड जि.नांदेड यांना रू.35,00,000/- (अक्षरी पस्तीस लक्ष रूपये) एवढ्या किंमतीस श्री हणमंत तुकाराम रपकाळ, रा.लक्ष्मीनारायण नगर, नांदेड यांनी कायमचा विक्री केलेला आहे, तसेच ईसारापोटी दि.11.09.2026 रोजी धनादेश क्र.043741 द्वारे रू.7,00,000/- एवढी रक्कम लिहुन देणार यांना देण्यात आली आहे व उर्वरीत रक्कम रू.28,00,000/- (अक्षरी अठ्ठावीस लक्ष रूपये) एवढी रक्कम रजिस्ट्रीच्या दिवशी देण्याचे ठरले आहे.

तरी उपरोक्त व्यवहारावर कोणाचा कोणताही, जागेचा आर्थिक / वाटणी / हिस्सा, कुळ, कर्ज, खाजगी अथवा सहकारी संस्था तथा सरकारी कर्जाचा काही बोजा ई.असल्यास संस्थेच्या सचिव अथवा अध्यक्षाकडे आपला लेखी कागदपत्रासह काही आक्षेप, उजर, हितसंबंध असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत लेखी पुराव्यासह संस्थेकडे द्यावा. मुदतीनंतर कोणाचाही आक्षेप स्विकारल्या जाणार नाही. त्यानंतर फ्लॅट क्र.401 हा श्री हणमंत तुकाराम रपकाळ यांचे नावावरून श्री सुमीत मारोतीराव गायकवाड यांच्या नावावर हस्तांतरीत करण्यात येईल. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी म्हणुन हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

जाहीर प्रगटन देणार
अध्यक्ष
दि. टिळकनगर को-ऑप, हॉसिंग सोसाटी (म.) नांदेड

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

शनिवार, दि. १४ नोव्हेंबर २०२६ पान ६

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

शासनाच्या उदासीनतेविरोधात न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा संताप; १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप

नांदेड (प्रतिनिधी)–उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सर्व प्रकारे रीतसर मार्ग अवलंबूनही तोडगा निघाला नसल्याने अखेर नांदेडसह राज्यातील ४० हजार आजी-माजी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाची हाक दिली आहे. शासन निर्णय निर्गमित होईपर्यंत माघार घेणार नसल्याची माहिती महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने देण्यात आली आहे.

उच्च न्यायालयातील कर्मचारी आणि राज्यातील दुय्यम न्यायालयात कार्यरत कर्मचारी हे एकाच नाण्याच्या दोन समान बाजू आहेत. २०२३ पर्यंत दोन्ही कर्मचाऱ्यांचे वेतन समान होते. परंतु २०२३ मध्ये उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. याच धर्तीवर दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही हाच निर्णय लागू करणे अपेक्षित होते, परंतु तसे झाले नाही. शासनाने दोन्ही कर्मचाऱ्यांमध्ये दुजाभाव करून दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीपासून आजवर वंचित ठेवले आहे, असे संघटनेचे म्हणणे आहे.

सध्या वाढलेली महागाई आणि त्या महागाईत हातात येणारा तुटपुंजा पगार, त्या तुलनेत इतर शासकीय विभागातील समकक्ष कर्मचाऱ्यांचे वेतन आणि वेतनश्रेणीबाबतचे शासन निर्णय सातत्याने निर्गमित झाले असतानाही न्यायालयीन कर्मचारी वर्षानुवर्षे का दुर्लक्षित राहिला? हा गहन प्रश्न न्यायालयीन कर्मचाऱ्यांना भेडसावत आहे.

दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयानेच न्यायमूर्तींची समिती गठित करून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव जानेवारी २०२५ मध्येच शासनास सादर केला असतानाही शासनाने ही बाब अद्यापही गांभीर्याने घेतलेली नाही. विशेष म्हणजे सध्या राज्याचे वित्त आणि न्याय खाते तसेच अर्थखाते हे स्वतः मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारित येत असतानाही दुसऱ्यांना न्याय देणाऱ्या न्यायव्यवस्थेचा कणा असणारा न्यायालयीन कर्मचारीच न्यायापासून वंचित राहिला आहे. या न्यायाला वाचा कोण फोडणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

या संपास महाराष्ट्र राज्य न्यायिक अधिकारी संघ, महाराष्ट्र आणि गोवा बार असोसिएशन, जिल्हा आणि तालुका वकील संघ यांच्यासह राज्यातील बहुसंख्य सर्वपक्षीय आमदार-खासदार यांनी पाठिंबा दिला आहे. तर दुसरीकडे महासंघाचे राज्याध्यक्ष दिगंबर निकम हे १७ नोव्हेंबरपासून नाशिक येथे आमरण उपोषणास बसणार आहेत. तसेच राज्यातील सेवानिवृत्त कर्मचारी पुन्हा साखळी उपोषणास बसणार असून, कार्यरत न्यायालयीन कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्यामुळे राज्यातील न्यायव्यवस्था कोलमडण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे आता शासन नेमकी काय भूमिका घेणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

या बेमुदत संपात जिल्ह्यातील सर्व न्यायालयीन कर्मचारी सक्रिय सहभाग नोंदवणार आहेत. सोबतच आधी जी. आर., मगच माघार असा ठाम निर्धार नांदेड जिल्हा तृतीय श्रेणी न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष नागेश गिरगावकर, सचिव विनोद पाथरकर, लघुलेखक संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी खिंडरे, बेलीफ संघटनेचे जिल्हाध्यक्ष मकबुल शेख यांच्यासह चतुर्थश्रेणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मो. फसीओद्दीन सिद्दिकी आदींनी केला आहे.

अर्धापुरातील तलाव परिसरात चौपाटी व निसर्गरम्य पर्यटन स्थळ निर्माण करू -खा. अशोकराव चव्हाण



अर्धापूर (प्रतिनिधी)- येथील तलाव परिसरात चौपाटी निर्माण करून पाणी पुरी, गोल गप्पे यासाठी पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी जे जे महाराष्ट्रात चांगले आहे ते ते शहरात व्हावे यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दीपावली पहाट कार्यक्रमात बोलताना खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली.

दिवाळी पहाट संगीत मेजवानी कार्यक्रमाचे आयोजन तलाव परिसरात करण्यात आले होते. या कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, आ. अँड. श्रीजयाताई चव्हाण, आ. अमरनाथ राजूरकर, ज्येष्ठ नेते धर्मराज देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष अँड किशोर देशमुख, सभापती संजय देशमुख लहानकर, अधिवक्ता संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष अँड. यदुपतराव अर्धापूरकर, माजी सभापती किशोर स्वामी, चेअरमन नरेंद्र चव्हाण, भाजप तालुकाध्यक्ष बालाजीराव गव्हाणे, संचालक गोविंदराव शिंदे, बी. आर. कदम, कृऊबाचे संचालक निळकंठराव मदने आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख, सौ. शालीनी शेटे, सौ. मीनाक्षी राऊत यांनी केला.

यावेळी बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, तलाव परिसरातील सर्व कामे लवकर करून पर्यटनस्थळ निर्माण करण्यासाठी जे जे आवश्यक ते करून तलाव परिसर निसर्गरम्य ठिकाण विकसित झाले आहे. या तलाव परिसरात चौपाटी निर्माण करायची असल्याची माहिती जनतेला दिवाळी पहाट कार्यक्रमात बोलताना खा. चव्हाण यांनी दिली.

यावेळी बोलताना आ. श्रीजयाताई चव्हाण म्हणाल्या की, दुष्काळी परिस्थितीत पाणी जपून वापरत काटकसर करणे आवश्यक आहे.

दिवाळी पहाट संगीत मेजवानी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, राजू शेटे, नगरसेवक राजेश्वर देशमुख, नवनाथ बारसे यांनी प्रयत्न केले. यावेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणकर, सोशल मीडियाचे राजू बारसे, जिल्हा उपाध्यक्ष नागोराव भांगे, सुधाकर कदम, रामराव भालेराव, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष गुरूराज रणखांब, माजी नगराध्यक्ष नासेरखान पठाण, पंडितराव लंगडे, माजी उपनगराध्यक्ष प्रतिनिधी मुसवीर खतीब, संचालक व्यंकटराव साखरे, सोनाजी सरोदे, डॉ.विशाल लंगडे, नगरसेवक गाजी काजी, पंडितराव लंगडे, युवानेते अभिषेक गुरखेल, उमाकांत सरोदे, दिलीप डाहाळे, भाजपाचे अजय देशमुख, सुरज माढे, तुकाराम माटे, व्यंकटी राऊत, बाबुराव लंगडे, योगेश हाळदे, विलास साबळे, बाळू माटे, गोपाल पंडीत, बाबुराव जाधव आदींसह अनेकजण उपस्थित होते.

थकबाकीपोटी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांसाठी महावितरणची अभय योजना सुरु

♦ 'बिगरकृषी' ग्राहकांना थकबाकीमुक्तीची संधी ♦ संपूर्ण व्याज, विलंब आकार 900 टक्के माफ ♦ एकरकमी भरणा केल्यास मूळ थकबाकीमध्ये २० टक्क्यांपर्यंत सवलत

नांदेड (प्रतिनिधी) – वीजबिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित बिगरकृषी वीजग्राहकांसाठी महावितरणची 'अभय योजना २०२६-२७' जाहीर केली आहे. ६ नोव्हेंबरपासून १५ जानेवारी २०२७ पर्यंत अंमलबजावणी केली जाणाऱ्या या योजनेचा लाभ नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या नांदेड परिमंडल कार्यालयाने केले आहे.

थकबाकीमुक्तीसाठी घसघशीत सवलतींचा समावेश असणाऱ्या अभय योजनेअंतर्गत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तर उर्वरित मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास त्यात आणखी २० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाणार आहे. यासह ग्राहकांच्या मागणीनुसार पुनर्जोडणीही तत्काळ मिळणार आहे.

३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) ग्राहक तसेच दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक 'अभय योजना २०२६-२७' साठी पात्र आहेत. तसेच महावितरण डिस्ट्रीब्युशन फ्रॅन्चाईजीमधील ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

या योजनेत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याजाची आणि विलंब आकाराची रक्कम १०० टक्के माफ करण्यात येईल. मूळ थकबाकीची रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची ग्राहकांना सुविधा आहे. ही योजना सुरू झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांना 'अर्ली बर्ड रिबेट'चा फायदा देण्यात येईल. यात लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना ३ वर्षांपर्यंत वीजजोडणी कायमस्वरूपी खंडित असल्यास १० टक्के तर ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कायमस्वरुपी खंडित असल्यास २० टक्के सवलत मिळेल. तसेच लघुदाब घरगुती व व्यावसायिक वगळून इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट मिळेल. लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते तर उच्चदाब ग्राहकांना थकबाकीनुसार व्याजमुक्त ३ ते ६ हप्त्यांची सुविधा उपलब्ध असेल.

यासोबतच मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत आहे अशा ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी 'प्रीपेड स्मार्ट मीटर'चा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत दिली जाईल. उल्लेखनीय म्हणजे या योजनेत सहभागी सर्व ग्राहकांसाठी पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

'अभय योजना २०२६-२७' साठी अर्जाची प्रक्रिया अत्यंत सुलभ आणि ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महावितरणच्या ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे ग्राहक अर्ज करू शकतील. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

योग विद्याधामच्यावतीने उद्यापासून नि:शुल्क योग वर्गाचे आयोजन

नांदेड (प्रतिनिधी)- योग विद्या धाम नांदेडच्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त नांदेड शहरात विविध ठिकाणी १५ नोव्हेंबरपासून नि:शुल्क योग वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेड शहरातील शिवमंदिर चैतन्य नगर, हनुमान मंदिर विद्युत नगर, कामगार कल्याण भवन लेबर कॉलनी, नांदेड क्लब, हनुमान मंदिर विजयनगर, श्री लक्ष्मी नारायण नगर, भगवान बालाजी मंदिर जुना कौठा, आयुर्वेदिक रुग्णालय पहिला मजला आदी ठिकाणी होतील. या वर्गाचा कालावधी १५ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर असे राहील आणि हे वर्ग सकाळी ६ ते ७ या वेळेत होतील. योग विद्याधाम हे एक योगाचे शास्त्रोक्त पद्धतीने योगशिक्षण देणारी नामांकित संस्था आहे. तरी योगप्रेमींनी या मोफत व दर्जेदार योग वर्गाचा लाभ घ्यावा आणि आनंदी जीवन जगावे, असे आवाहन योग विद्याधाम नांदेडचे अध्यक्ष रमेश केंद्रे आणि सचिव नागोराव पोलादवार यांनी केले आहे.

सिडकोतील मुख्य रस्त्यावर भरधाव हायवा उलटून पानटपरीसह घराच्या भिंतीचे नुकसान, जीवितहानी टळली, दोन जखमी

नवीन नांदेड (प्रतिनिधी)- सिडको परिसरातील मुख्य मार्गावरील भरधाव हायवा गाडीने मुरूमाची वाहतूक करणाऱ्या ट्रकचे नियंत्रण सुटल्याने हायवा वाहन पलटी झाल्याने ट्रक चालकासह किन्नर जखमी झाला असून, रोडलगत असलेल्या पानटपरीसह घराच्या भिंतीचे सुध्दा या अपघातात नुकसान झाले आहे. ही घटना १० नोव्हेंबर रोजी पहाटे २ वाजेच्या सुमारास सिडको परिसरातील जुने वसंतराव नाईक महाविद्यालय समोरील भागात घडली.

या घटनेत घरासह 'महेश डेली नीड्स सेंटर' या दुकानाचा आणि हायवाचा चक्काचूर होऊन लाखोंचे नुकसान झाले. अपघात घडल्यानंतर जेसीबी क्रेन सहायाने हायवा ट्रक काढण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अपघातग्रस्त



हायवामधून ट्रक चालकासह किन्नर यांना बाहेर काढण्यात आले.

नवीन नांदेड भागातून गेल्या अनेक दिवसांपासून भरधाव वेगाने जाणाऱ्या, येणाऱ्या हायवा ट्रक चालकावर नियंत्रण नसल्याने भर वसाहतीतून जवळपास शेकडो हायवा मुरूम, गिट्टी, दगड भरून ये-जा करत आहेत, १० नोव्हेंबर रोजी मुरुम भरून रमामाता आंबेडकर चौक ते लातूर फाटा जाणाऱ्या मुख्य मार्गावर रात्री वसंतराव नाईक महाविद्यालयसमोर ट्रक चालकाचे नियंत्रण सुटल्याने हायवा पलटी होऊन या धडकेत संबंधित घराच्या दोन भिंती कोसळून ट्रकचे समोरील तोंड थेट आत घुसल्याने अपघाताची माहिती मिळताच ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि कपिल पाटील, पोउपनि बाबूराव चव्हाण, सहायक पोलीस उपनिरीक्षक रामकिशन मोरे आणि पोलीस अंमलदार राजू जंकूट, कमलाकर सदावर्ते, स्वामी, हणमंता कदम यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

अपघाता नंतर ट्रकच्या कॅबिनमध्ये अडकून पडलेले चालक संदीप रमेश लुंगारे (वय २६, रा. खांबेगाव, जि. नांदेड) आणि क्लिनर संदीप राघोजीराव लोखंडे (वय २८, रा. सातेगाव, जि. परभणी) यांना क्रेन व जेसीबीच्या मदतीने बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

नांदेड शहरातील स्मशानभूमी सौर प्रकाशाने उजळणार

खा. डॉ. गोपछडे यांच्या पुढाकारातून रामघाटावर उपक्रमाचे भूमिपूजन

नांदेड (प्रतिनिधी) –शहरातील सर्व हिंदू स्मशानभूमीमध्ये सौरऊर्जेवर आधारित प्रकाशव्यवस्था उभारण्यात येणार असून, राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांच्या पुढाकारातून या महत्त्वपूर्ण उपक्रमाला सुरुवात झाली आहे. कॅनफिन होम्स लि. यांच्यातर्फे हा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात येत आहे.

शुक्रवार, दि. १३ रामघाट येथील रुद्रभूमी स्मशानभूमीत या उपक्रमाचा प्रातिनिधिक शुभारंभ रुद्रभूमी काळजीवाहक मसोनजोगी यांच्या हस्ते भूमिपूजन करून करण्यात आला. सौरऊर्जेवर चालणारे स्ट्रीट लाईट पोल उभारण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांच्या कामाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने शहरातील सर्व स्मशानभूमीमध्ये ही प्रकाशव्यवस्था उभारण्यात येणार आहे.



त्यामुळे रात्रीच्या वेळी स्मशानभूमीमधील अंधार दूर होऊन नागरिकांना सुरक्षित आणि पुरेशी प्रकाशव्यवस्था उपलब्ध होणार आहे. विकासाच्या प्रत्येक कार्यात सामाजिक बांधीलकी आणि जनसेवेचा संकल्प जपत स्वच्छ ऊर्जा, सुरक्षित परिसर आणि लोकहिताचा विकास साधण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नदिड शहरातील सार्वजनिक विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी एक व्यापक बैठक घेण्यात येईल. यातून महिलांच्या उन्नतीचा नवा मार्ग शोधला जाईल. शहरात महिलांसाठी ई- टॉयलेट उभारण्यासाठी महापालिकेने नियोजन करावे, असे सूचित करत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी रुद्रभूमीची माती पावसात वाहून जाऊ नये, यासाठी संरक्षण भिंत उभारण्यासाठी आवश्यक निधी देण्याचे जाहीर केले.

नांदेडहून थेट शबरीमालाकडे; १५ नोव्हेंबरपासून विशेष रेल्वेगाडी सुरू

नांदेड (प्रतिनिधी)- शबरीमाला यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड- कोल्लम- चेर्लापल्ली दरम्यान विशेष साप्ताहिक रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रेन ऑन डिमांड अंतर्गत ०७१८९/०७१९० या क्रमांकाने ही विशेष गाडी चालविण्यात येणार आहे.


ही गाडी दि. १५ नोव्हेंबर २०२६ (रविवार) रोजी नांदेडहून सायंकाळी ५.१५ वाजता रवाना होईल. मुदखेड, बासर, निजामाबाद, कामारेड्डी, चेरलापल्ली, नलगोंडा, मिर्यालगुडा, नाडीकुडे, पिडुगुरल्ला, गुंटूर, तेनाली, बापटला, चिराला, ओंगोल, नेल्लोर, गुडूर, पेरंबूर, अरक्कोनम, काटपाडी, जोलारपेट्टई, सलेम, इरोड, तिरुप्पूर, पोदनूर, पालक्काड, शोरनूर, त्रिशूर, अलुवा, एर्नाकुलम, कोट्टायम, चंगनाशेरी, तिरुवल्ला आणि चेंगन्नूर मार्गे दि. १७ नोव्हेंबर २०२६ (मंगळवार) रोजी सकाळी ७.५५ वाजता कोल्लम येथे पोहोचेल.

गाडी क्र. ०७१९० कोल्लम-चेर्लापल्ली विशेष -ही गाडी दि. १७ नोव्हेंबर २०२६ (मंगळवार) रोजी कोल्लमहून सकाळी १०.५५ वाजता रवाना होईल. तिरुवल्ला, चंगनाशेरी, कोट्टायम, एर्नाकुलम, अलुवा, त्रिशूर, शोरनूर, पालक्काड, पोदनूर, तिरुप्पूर, इरोड, सलेम, जोलारपेट्टई, काटपाडी, अरक्कोनम, पेरंबूर, गुडूर, नेल्लोर, ओंगोल, चिराला, बापटला, तेनाली, गुंटूर, पिडुगुरल्ला, नाडिकुडे, मिर्यालगुडा आणि नलगोंडा मार्गे दि. १८ नोव्हेंबर २०२६ (बुधवार) रोजी सायंकाळी ७ वाजता चेरलापल्ली येथे पोहोचेल.

'लोकमाता गोदावरी' पुस्तकाचे उद्या प्रकाशन

जिल्हाधिकारी कर्डिले व अतुल देऊळगावकर यांची उपस्थिती

नांदेड (प्रतिनिधी)- चंद्रकला आणि एल. के. कुलकर्णी या शिक्षक दाम्पत्याने संयुक्तपणे लिहिलेल्या 'लोकमाता गोदावरी-समग्र दर्शन' या नव्या पुस्तकाचे प्रकाशन रविवार, दि. १५ येथील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवनाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.



हे पुस्तक पुण्याच्या राजहंस प्रकाशन संस्थेने गेल्या महिन्यात प्रकाशित केले. त्याचे प्रकाशन पर्यावरण तज्ज्ञ व लेखक अतुल देऊळगावकर यांच्या हस्ते व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली केले जाणार आहे.

कुलकर्णी दाम्पत्याने सुमारे एक तपांपूर्वी गंगा नदीवरील 'गंगे तुझ्या तीराला' हा महत्त्वाचा ग्रंथ मराठी वाचकांसमोर आणला होता. भारतीय लोकजीवनाचा अविभाज्य भाग असलेली गंगा नदी, तिचा भौगोलिक विस्तार आणि तिच्या सांस्कृतिक प्रभावाचा समग्र मागोवा या ग्रंथामध्ये घेण्यात आला होता. त्यानंतर या दाम्पत्याने दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीचा समग्र अभ्यास तसेच गोदातीराची भ्रमंती करून करून महाराष्ट्रातील एका महत्त्वाच्या नदीची थोरवी वाचकांसमोर आणली आहे.

गोदावरी नदीचा गौरव करणारे काव्य, स्तोत्रे आणि आरत्याही वेगवेगळ्या कालखंडात लिहिल्या गेल्या. संत दासगणू महाराजांचा अभंग तर सुप्रसिद्ध आहे. राम शेवाळकर यांनीही 'स्वये गोदावरी आली' ही कविता आपल्या रेघा या संग्रहातून वाचकांसमोर ठेवली होती. इतर अनेक लेखकांनीही गोदावरी नदी, गोदावरी खोरे यावर पुस्तके लिहिली आहेत; परंतु कुलकर्णी दाम्पत्याने या नदीची समग्र महती पुस्तकात मांडली आहे. वरील प्रकाशन समारंभास साहित्यिक, शिक्षक, पत्रकार व पुस्तकप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजहंस प्रकाशन आणि अभंग पुस्तकालय या आयोजक संस्थांनी केले आहे.

विजयाताई घिसेवाड यांचे निधन



भोकर (प्रतिनिधी)- येथील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, संगीत क्षेत्रातील उत्तम कामगिरी करणाऱ्या राज्यस्तरीय शिक्षिका पुरस्कार प्राप्त, माजी नगरसेविका विजयाताई रमेशराव घुमनवाड-घिसेवाड (५५) यांचे १३ नोव्हेंबर २०२६ रोजी पहाटे ५ वाजता निधन झाले.

विविध सामाजिक कार्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहत होता, भाजपा महिला मोर्चाच्या त्या पदाधिकारी होत्या, अतिशय मेहनती, कष्टाळू आणि विद्यार्थ्यांप्रती आस्था असलेल्या कलाप्रेमी शिक्षिका होत्या, मागील काही दिवसांपासून त्या आजाराशी झुंज देत होत्या. शेवटी त्यांची प्राणज्योत मालवली. १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७-३० वाजता हिंदू स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी, अधिकारी, कर्मचारी सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दोन ठिकाणी घरफोडीत २.३६ लाखांचा ऐवज लंपास, कामठा रोडवर मारहाण करून १५ हजारांची लूट; सात जणांना अटक

नांदेड (प्रतिनिधी)- शहराच्या भाग्यनगर आणि नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच्या घटना उघडकीस आल्या असून, याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तर तिसऱ्या घटनेत विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाला जबर मारहाण करून लुटमार केल्याची घटना पुढे आली आहे.

शहराच्या नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत दि. ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता ते दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या राहत्या घरी, महबुबीया कॉलनी, नांदेड येथे अज्ञात चोरट्याने घराचा कुलूप-कोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व नगदी असा एकूण ४१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

शेख सुजाज हसनसाब, वय ४६ वर्षे, रा. महबुबीया कॉलनी, नांदेड यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण ठाण्यात गु.र.नं. १४४८/२०२६, कलम ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता-२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार तेलंगे करत आहेत.

दुसऱ्या घटनेत वर्धमान नगरमध्ये १ लाख ९५ हजार ७५० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. दि. ९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता ते दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या दरम्यान फिर्यादीच्या राहत्या घरी, वर्धमाननगर, मालेगाव रोड, नांदेड येथे अज्ञात चोरट्याने फिर्यादी व साक्षीदार यांच्या घराचा कुलूप- कोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील व लोखंडी पेटीतील सोन्या- चांदीचे दागिने व नगदी असा एकूण लाख ९५ हजार ७५० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला.

सुप्रिया विठ्ठलराव पाटील, वय ३० वर्षे, रा. वर्धमान नगर, मालेगाव रोड, नांदेड यांच्या फिर्यादीवरून भाग्यनगर ठाण्यात गु.र.नं. ६६४/२०२६, कलम ३३१(३)(४), ३०५ भारतीय न्याय संहिता-२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोउपनि नरेश वाडेवाले करत आहेत.

पी. जी. ठाकूर यांचे निधन



नांदेड (प्रतिनिधी)- येथील यशवंत महाविद्यालयाचे निवृत्त प्रयोगशाळा सहायक पी. जी. ठाकूर यांचे अल्प आजाराने शुक्रवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर राहत्या गावी लहान येथे शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते मनमिळावू आणि शांत स्वभावाचे होते.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com